**मनि त्रिसना न बुझी मेरे पिआरे नित आस करे ।।**
**नित जोबनु जावै मेरे पिआरे जमु सास हिरे ।।**
**भाग मणी सोहागणि मेरे पिआरे नानक हरि उरि धारे ।।२ ।।**
**पिर रतिअड़े मैडे लोइण मेरे पिआरे चात्रिक बूंद जिवै ।।**
**मनु सीतलु होआ मेरे पिआरे हरि बूंद पीवै ।।**
**तनि बिरहु जगावै मेरे पिआरे नीद न पवै किवै ।।**
**हरि सजणु लधा मेरे पिआरे नानक गुरू लिवै ।।३ ।।**
**चड़ि चेतु बसंतु मेरे पिआरे भलीअ रुते ।।**
**पिर बाझड़िअहु मेरे पिआरे आंगणि धूड़ि लुते ।।**
**मनि आस उडीणी मेरे पिआरे दुइ नैन जुते ।।**
**गुरु नानकु देखि विगसी मेरे पिआरे जिउ मात सुते ।।४ ।।**
**हरि कीआ कथा कहाणीआ मेरे पिआरे सतिगुरू सुणाईआ ।।**
**गुर विटड़िअहु हउ घोली मेरे पिआरे जिनि हरि मेलाईआ ।।**
**सभि आसा हरि पूरीआ मेरे पिआरे मनि चिंदिअड़ा फलु पाइआ ।।**
**हरि तुठड़ा मेरे पिआरे जनु नानकु नामि समाइआ ।।५ ।।**
**पिआरे हरि बिनु प्रेमु न खेलसा ।।**
**किउ पाई गुरु जितु लगि पिआरा देखसा ।।**
**हरि दातड़े मेलि गुरू मुखि गुरमुखि मेलसा ।।**
**गुरु नानकु पाइआ मेरे पिआरे धुरि मसतकि लेखु सा ।।६ ।।१४ ।।२१ ।।**

(श्री. गु. ग्रं. सा. ४५१)

**शब्दार्थ : परदेसी** – दूर भटकणारा; **आउ** – ये; **घरे** – निजस्वरूप, स्वस्वरूप; **मिलावहू** – प्राप्त कर, भेटव; **माणहु** – उपभोग घे; **तुठा** – संतुष्ट, प्रसन्न; **चाखिआ** – चव घेणे, चाखणे; **भाउ** – प्रेम; **सास** – श्वास; **भागमणी** – भाग्यमणी; **उरिधारे** – हृदयाशी धरणे; **पिर** – पती; **रतिअडे** – रंगून जाणे; **मैडे** – माझे; **लोइण** – लोचन, डोळे; **चात्रिक** – चातक पक्षी; **विरहु** – विरह यातना; **लधा** – लाभला; **लिवै** – प्रेम; **चड़ि** – सुखात; **चेतु** – चैत्र; **भलिए** – चांगला, रम्य; **रुते** – ऋतू; **बाझड़िअहु** – शिवाय; **धूड़ि** – धूळ; **लुते** – उडते; **उडीणी** – उदासीन; **जुते** – जोडणे, जुळणे, एकाग्र होणे; **जिउ** – ज्याप्रमाणे; **विगसी** – प्रसन्न होणे, प्रफुल्लित होणे; **सुणाइआ** – ऐकवली; **विटडिअहु** – समर्पित; **मेलाइआ** – मिलन घडवले; **चिंदिअडा** – चिंतिलेले; **तुठणा** – संतुष्ट झाले; **खलसा** – खेळणे, एकत्रित करणे; **देखसा** – दिसणे, पाहणे; **दातड़े** – दाता; **लेखुसा** – लेख, कर्मलेख.

**भावार्थ :** हे माझ्या प्रिय मना ! तू उगाच इकडे तिकडे भटकणे सोडून आपल्या मूळ स्वरूपात स्थिर रहा. प्रभूरूपी सतगुरूशी एकरूप हो. तुझ्या मनात प्रभू परमात्म्याचा वास आहे. हे मना ! तू त्या प्रभू परमात्म्याशी एकरूप होऊन प्रभुरंगात रममाण होऊन आत्मिक आनंदाचा उपभोग घे. तुझ्यावर प्रभूने कृपा केली आहे. नानक सांगतात, ज्याच्यावर सतगुरू प्रसन्न होतो त्याचे तो प्रभू परमात्म्याशी मिलन घडवतो. ।।१ ।। मी सदैव इच्छा आकांक्षातच रममाण झाल्यामुळे प्रभू परमात्म्यावर कधीच अंत:करणपूर्वक प्रेम केले नाही. प्रभुप्रेमाची चव मी कधी चाखलीच नाही. अशा प्रकारे जीवनाचा सर्व यौवनकाळ

मी वाया घालवला. आता मृत्यू समीप येऊन ठेपला आहे. नानक सांगतात, जी जीवस्त्री प्रभुपतीस (परमात्म्यास) आपल्या हृदयात दृढपणे धारण करते तीच खरी सौभाग्यवती होय. तिच्याच भाळी सौभाग्य तिलकरूपी मणी शोभून दिसतो. ॥२॥ ज्याप्रमाणे चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील जलबिंदूची ज्या आतुरतेने वाट पाहत असतो, त्याचप्रमाणे माझे डोळे प्रभुपतीच्या प्रेमासाठी आसुसले आहेत. प्रभुनामरूपी स्वातीजल पिऊन माझे मन तृप्त झाले आहे. शांत झाले आहे. जोपर्यंत प्रभुपतीची भेट होत नाही, तोवर माझे शरीर विरहव्यथेने तडफडत राहते. मला झोपही लागत नाही. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाने प्रभुनामात तल्लीन झाल्यामुळे मला प्रभुपती प्राप्त झाला. ॥३॥ चैत्र महिना सुरू झाला की ऋतुराज वसंताचेही आगमन होते. पण प्रभुपतीशिवाय माझ्या मनरूपी अंगणात मात्र ग्रीष्माच्या गरम धुळीचे वावटळच चालू असते. माझे मन उदास झाले आहे. माझे दोनही डोळे एकाग्र होऊन प्रभुदर्शनासाठी उत्सुक झाले आहेत. ज्याप्रमाणे माता आपल्या मुलाला पाहून प्रसन्न होते, त्याप्रमाणे सतगुरू नानकांना पाहून माझे मन प्रसन्न झाले. ॥४॥ प्रिय बंधू, माझ्या गुरूने मला प्रभुगुण कथा ऐकवली. मी त्या सतगुरूचरणी स्वत:स समर्पित करतो, ज्याने माझे प्रभू परमात्म्याशी मिलन घडवले. प्रभू परमात्म्याने माझ्या सर्व आशा पूर्ण केल्या. मी मनात इच्छिलेले फळ मला प्राप्त झाले आहे. नानक सांगतात, ज्याच्यावर प्रभू परमात्मा प्रसन्न झाला तो प्रभुनामात तल्लीन होऊन जातो. ॥५॥ हे प्रिया ! मला त्या एकमेव प्रभुपरमात्म्याशिवाय अन्य कोणावरही प्रेम करावयाचे नाही. हे प्रभो ! ज्याच्यामुळे मला तुझे दर्शन प्राप्त होईल असा सतगुरू मला कसा प्राप्त होईल ? हे महादानी प्रभू ! मला सतगुरू भेटव. त्याच्यामुळेच मला तुझे दर्शन प्राप्त होईल. नानक सांगतात, ज्याच्या भाग्यलेखात आधीपासून तसे लिहून ठेवले असेल, तरच त्यास सतगुरू प्राप्त होतो. ॥६॥१४॥२१॥

**॥ रागू आसा महला ५ छंत घरु १ ॥**

**१ ओअंकार सतिगुरू प्रसादि ॥**

(ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.)

**अनदो अनदु घणा मै सो प्रभु डीठा राम ॥**
**चाखिअड़ा चाखिअड़ा मै हरि रसु मीठा राम ॥**
**हरि रसु मीठा मन महि वूठा सतिगुर तूठा सहजु भइआ ॥**
**ग्रिहु वसि आइआ मंगलु गाइआ पंच दुसट ओइ भागि गइआ ॥**
**सीतल आघाणे अंम्रित बाणे साजन संत बसीठा ॥**
**कहु नानक हरि सिउ मनु मानिआ सो प्रभु नैणी डीठा ॥१॥**
**सोहिअड़े सोहिअड़े मेरे बंक दुआरे राम ॥**
**पाहुनड़े पाहुनड़े मेरे संत पिआरे राम ॥**
**संत पिआरे कारज सारे नमसकार करि लगे सेवा ॥**
**आपे जाञी आपे माञी आपि सुआमी आपि देवा ॥**
**अपणा कारजु आपि सवारे आपे धारन धारे ॥**
**कहु नानक सहु घर महि बैठा सोहे बंक दुआरे ॥२॥**
**नव निधे नउ निधे मेरे घर महि आई राम ॥**
**सभु किछु मै सभु किछु पाइआ नामु धिआई राम ॥**

**नामु धिआई सदा सखाई सहज सुभाई गोविंदा ॥**
**गणत मिटाई चूकी धाई कदे न विआपै मन चिंदा ॥**
**गोविंद गाजे अनहद वाजे अचरज सोभ बणाई ॥**
**कहु नानक पिरु मेरै संगे ता मै नव निधि पाई ॥३ ॥**
**सरसिअड़े सरसिअड़े मेरे भाई सभ मीता राम ॥**
**विखमो विखमु अखाड़ा मै गुर मिलि जीता राम ॥**
**गुर मिलि जीता हरि हरि कीता तूटी भीता भरम गड़ा ॥**
**पाइआ खजाना बहुतु निधाना साणथ मेरी आपि खड़ा ॥**
**सोई सुगिआना सो परधाना जो प्रभि अपना कीता ॥**
**कहु नानक जां वलि सुआमी ता सरसे भाई मीता ॥४ ॥१ ॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४५२)

**शब्दार्थ : अनदो अनदु** – आनंदीआनंद; **चाखडिआ** – चाखले; **बुठा** – वास केला; **पंच** – पाच विकार; **दुसट** – दुष्ट; **आघावे** – परिपूर्ण, तृप्त; **नाणे** – वाणी; **बसिठा** – मध्यस्थ; **डीठा** – पाहिला; **सोहिअडे** – सुंदर; **बंक** – सुंदर; **पाहुगडे** – पाहुणे; **जाजी** – वऱ्हाड; **माजी** – मध्यस्थ; **सुआमी** – नवरदेव; **सहु** – स्वामी; **सोहे** – शोभतात; **सुखाई** – सहायक; **गणत** – हिशोब, कर्मलेख; **घाई** – यातायात; **कदे** – कधीही; **चिंदा** – चिंता; **सरसिअड़े** – आनंदित, प्रसन्न, **बिखमु** – विषम; **आखाडा** – संसाररूपी, आखाडा; **कीता** – केले; **तूटी** – तुटरी; **भीता** – भिंत; **भरमगड़ा** – भ्रमरूपी किल्ला; **निधाना** – भांडार; **साणथ** – साहाय्यार्थ; **सुगिआना** – सुविद्य; **जा** – जेव्हा, ज्याचा; **वलि** – बाजूने; **ता** – तेव्हा, त्याचा; **सरसे** – प्रसन्न.

**भावार्थ :** आज मला आनंदीआनंद झाला आहे. परमानंद झाला आहे. आज मला प्रभुरामाचे दर्शन झाले. आज मी रामनामरूपी अमृताची चव चाखली. माझ्यावर सतगुरू प्रसन्न झाल्याने माझ्या अंतःकरणात मधुरतम प्रभुनामरूपी अमृताने वास केला. त्यामुळे माझे मन सहजभावात लीन झाले, मनात प्रभुनामरूपी मंगलगान प्राप्त झाल्याने पाचही दुष्ट विकार दूर पळून गेले. संतजनांच्या अमृतवाणींने माझे मन पूर्ण तृप्त होऊन शांत झाले. नानक सांगतात, मी त्या प्रभू परमात्म्यास प्रत्यक्ष पाहिले आहे. माझे मन प्रभुरूपात विलीन झाले आहे. ॥१ ॥ माझा सुंदर राम माझ्या द्वारी आल्यामुळे माझे सर्वांग आनंदाने पुलकित झाले आहे. संतसज्जन माझ्याकडे पाहुणे म्हणून आले आहेत, मी त्यांना नमस्कार केला, तेव्हा त्या प्रिय संतजनांनी माझे कार्य संपन्न केले. हे प्रभू! तूच वऱ्हाडी आहेस, तूच मध्यस्थ आहेस आणि ते संपन्न करणाराही तूच आहेस. तूच ही सृष्टी निर्माण केली आहेस. व तिची धारणाही तूच करतोस. नानक सांगतात, माझ्या हृदयात प्रभू परमात्म्याने स्थान ग्रहण केल्यामुळे माझी ज्ञानेंद्रिये आनंदाने सुशोभित झाली आहेत. ॥२ ॥ प्रभुरामाने माझ्या हृदयात वास केल्याने जणू ह्या जगातील सर्व नऊनिधी सारी संपत्तीच मला प्राप्त झाली. रामनामाच्या स्मरणाने मला सर्व सर्व प्राप्त झाले आहे. सहजभावात लीन होऊन स्वाभाविकपणे प्रभुनामाचे स्मरण केल्याने तो प्रभू गोविंद माझा मित्र सखा बनला आहे. आता माझा कर्मलेख पुसला गेला आहे. आता कोणतीही यातायात, कष्ट भोगावे लागत नाहीत. कोणती चिंता माझ्या मनाला व्यापत नाही. जेव्हा माझ्या हृदयात प्रभू परमात्मा प्रगट झाला, तेव्हा माझ्या अंतःकरणात अनाहत ध्वनी गुंजन करू लागला. सर्वत्र एक आश्चर्ययुक्त शोभा दिसत आहे. नानक सांगतात, जेव्हा मला माझ्या प्रभुपतीचा संग लाभला, तेव्हा जणू मला जगातील सर्व नऊ निधीची प्राप्ती झाल्याचा आनंद प्राप्त झाला. ॥३ ॥ माझे सारे मित्र, माझे सारे आप्त आनंदित झाले. सतगुरू प्राप्त करून मी ह्या संसाररूपी विषम व अत्यंत महाकठीण असा हा आखाडा जिंकला आहे. सतगुरु प्राप्त झाल्यामुळे भ्रमरूपी किल्ल्याचा

तट मी तोडून टाकला आहे, व जीवनरूपी लढाई जिंकली आहे. प्रभू परमात्मा स्वत: माझ्या सहायार्थ धावून आल्यामुळे मला आत्मिक आनंदाचा फार मोठा खजिनाच प्राप्त झाला आहे. ज्यास प्रभू परमात्म्याने आपलेसे केले तोच खरा ज्ञानी, तोच खरा श्रेष्ठ. नानक सांगतात, ज्याच्या बाजूला प्रभू आहे त्याचे बंधू, त्याचे मित्र, सर्वजण आनंदित होतात. ॥४॥१॥

**॥ आसा महला ५ ॥**

**अकथा हरि अकथ कथा किछु जाइ न जाणी राम ॥**
**सुरि नर सुरि नर मुनि जन सहजि वखाणी राम ॥**
**सहजे वखाणी अमिउ बाणी चरण कमल रंगु लाइआ ॥**
**जपि एकु अलखु प्रभु निरंजनु मन चिंदिआ फलु पाइआ ॥**
**तजि मानु मोहु विकारु दूजा जोती जोती समाणी ॥**
**बिनवंति नानक गुर प्रसादी सदा हरि रंगु माणी ॥१ ॥**
**हरि संता हरि संत सजन मेरे मीत सहाई राम ॥**
**वडभागी वडभागी सतसंगति पाई राम ॥**
**वडभागी पाए नामु धिआए लाथे दूख संतापै ॥**
**गुर चरणी लागे भ्रम भउ भागे आपु मिटाइआ आपै ॥**
**करि किरपा मेले प्रभि अपुनै विछुड़ि कतहि न जाई ॥**
**बिनवंति नानक दासु तेरा सदा हरि सरणाई ॥२ ॥**
**हरि दरे हरि दरि सोहनि तेरे भगत पिआरे राम ॥**
**वारी तिन वारी जावा सद बलिहारे राम ॥**
**सद बलिहारे करि नमसकारे जिन भेटत प्रभु जाता ॥**
**घटि घटि रवि रहिआ सभ थाई पूरन पुरखु बिधाता ॥**
**गुरु पूरा पाइआ नामु धिआइआ जूऐ जनमु न हारे ॥**
**बिनवंति नानक सरणि तेरी राखु किरपा धारे ॥३ ॥**
**बेअंता बेअंत गुण तेरे केतक गावा राम ॥**
**तेरे चरणा तेरे चरण धूड़ि वडभागी पावा राम ॥**
**हरि धूड़ी न्हाईऐ मैलु गवाईऐ जनम मरण दुख लाथे ॥**
**अंतरि बाहरि सदा हदूरे परमेसरु प्रभु साथे ॥**
**मिटे दूख कलिआण कीरतन बहुड़ि जोनि न पावा ॥**
**बिनवंति नानक गुर सरणि तरीऐ आपणे प्रभ भाव ॥४ ॥२ ॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४५३)

**शब्दार्थ : सुरि** – श्रेष्ठ; **वखाणि** – वर्णन करतात; **अमिउ** – अमृतमय; **जपि** – जप; **दूजा** – द्वैतभाव; **बिनंतति** – विनवणी, प्रार्थना; **सजन** – सज्जन; **सहाइ** – साहाय्यक; **पाए** – प्राप्त; **लाथे** – दूर झाले; **विझुडि** – सोडून; **दरे** – द्वारी; **सोहनि** – शोभायमान; **वारी** – समर्पित; **जिन** – ज्यांना; **जाता** – ज्ञान होणे, जाणणे; **बेअंता** – अनंत; **केतक** – किती; **धुड़ी** – धूळ; **इदूरे** – प्रत्यक्ष, समोर; **बहुड़ि** – परत, फिरून; **तरिऐ** – तरून जाणे.

**भावार्थ :** हे प्रभू ! तुझी कथा अकथनीय आहे. तुला कोणीही जाणू शकत नाही. श्रेष्ठ साधक, मुनीजन सहजावस्था प्राप्त करून तुझे वर्णन करू शकतात. तुझ्या चरणकमलात रंगून जाऊन सहजावस्थेत स्थिर होऊन आपल्या अमृतमय वाणीने तुझे वर्णन करतात. त्या एकमेव अलक्ष्य, मायातीत प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केल्याने मनोवांच्छित फळ प्राप्त होते. गर्व, मोह, विकार, द्वैतभाव यांचा त्याग केल्याने जीवात्म्याची आत्मज्योत प्रभू परमात्म्याच्या परमज्योतीत सामावून जाते. नानक विनम्रभावाने सांगतात, की सतगुरुकृपेने जीव प्रभुनामात रंगून जातो. रममाण होतो. ॥१ ॥ प्रभुसेवक, संतसज्जन माझे मित्र आहेत. माझे सहकारी आहेत. महाभाग्याने मला संतसंगत प्राप्त झाली. महाभाग्यानेच मला प्रभुनामरूपी खजिना प्राप्त झाला. त्यामुळे माझ्या मनातील दु:ख, संताप सारे काही नष्ट झाले. ज्याने सतगुरुचरणांचा आश्रय घेतला, प्रभुकृपेने त्याच्या मनातील मोहमायेचा भ्रम नष्ट होतो. अहंकारही नष्ट होतो. ज्या प्रभुसेवकास प्रभू परमात्म्याने कृपापूर्वक आपले चरणी आश्रय दिला तो कधीही त्याच्यापासून दूर जात नाही. नानक विनंती करतात, की हे प्रभो ! मी तुझा दास तुझ्या चरणी शरण आलो आहे. ॥२ ॥ प्रभुराम, तुझ्या दारी, तुझ्या चरणी तुझे प्रिय भक्त शोभून दिसतात. मी त्यांच्यावर माझे सर्वस्व समर्पित करतो. ज्यांना प्रभू परमात्मा प्राप्त झाला, त्यांच्यावरून मी माझे प्राण ओवाळून टाकतो. त्यांना दंडवत घालतो. तो पूर्णपुरुष विधाता प्रभू प्रत्येक जीवाच्या ठायी रममाण होतो. प्रत्येक ठिकाणी तो विराजमान आहे. हे बंधू ! ज्यास पूर्णगुरू प्राप्त झाला, तो आपले जीवन वाया न घालवता प्रभुनामाचे स्मरण करण्यात आपले जीवन व्यतीत करतो. नानक विनंतीपूर्वक सांगतात, की हे प्रभो ! मी तुला शरण आलो आहे. माझ्यावर कृपा कर माझे रक्षण कर ॥३ ॥ हे प्रभो ! तू अनंत आहेस. तुझे गुणही अनंत आहेत. तुझे किती किती गुण गावेत ? हे प्रभो ! तुझे चरण, तुझ्या चरणाची धूळही महाभाग्यानेच प्राप्त होते. हरिनामरूपी धुळीने स्नान केले की मनातील मोहमायेचा, विषयविकारांचा मळ नष्ट होतो. जन्ममरणाचे दु:खही नष्ट होते. अंत:करणात, बाहेर, समोर सर्वत्र प्रत्यक्ष प्रभू जीवाची साथसंगत करत असतो. जो प्रभू परमात्म्याचे गुणगान करतो, त्याचे सर्व दु:ख दूर होते. त्यास परत कोणत्याही योनीत जन्म घ्यावा लागत नाही. नानक विनंतीपूर्वक सांगतात, की जो सतगुरूस शरण गेला, तो भवसागर तरून जातो. प्रभू परमात्म्यास प्रिय होतो. ॥४ ॥२ ॥

## ॥ आसा छंत महला ५ घरु ४ ॥

## १ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥

(ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.)

**हरि चरन कमल मनु बेधिआ किछु आन न मीठा राम राजे ॥**
**मिलि संत संगति आराधिआ हरि घटि घटे डीठा राम राजे ॥**
**हरि घटि घटे डीठा अंम्रितु वूठा जनम मरन दुख नाठे ॥**
**गुण निधि गाइआ सभ दूख मिटाइआ हउमै बिनसी गाठे ॥**
**प्रिउ सहज सुभाई छोडि न जाई मनि लागा रंगु मजीठा ॥**
**हरि नानक बेधे चरन कमल किछु आन न मीठा ॥१ ॥**
**जिउ राती जलि माछुली तिउ राम रसि माते राम राजे ॥**
**गुर पूरै उपदेसिआ जीवन गति भाते राम राजे ॥**
**जीवन गति सुआमी अंतरजामी आपि लीए लड़ि लाए ॥**
**हरि रतन पदारथो परगटो पूरनो छोडि न कतहू जाए ॥**

**प्रभु सुघरु सरूपु सुजानु सुआमी ता की मिटै न दाते ।।**
**जल संगि राती माछुली नानक हरि माते ।।२ ।।**
**चात्रिकु जाचै बूंद जिउ हरि प्रान अधारा राम राजे ।।**
**मालु खजीना सुत भ्रात मीत सभहूं ते पिआरा राम राजे ।।**
**सभहूं ते पिआरा पुरखु निरारा ता की गति नही जाणीऐ ।।**
**हरि सासि गिरासि न बिसरै कबहूं गुर सबदी रंगु माणीऐ ।।**
**प्रभु पुरखु जगजीवनो संत रसु पीवनो जपि भरम मोह दुख डारा ।।**
**चात्रिकु जाचै बूंद जिउ नानक हरि पिआरा ।।३ ।।**
**मिले नराइण आपणे मानोरथो पूरा राम राजे ।।**
**ढाठी भीति भरंम की भेटत गुरु सूरा राम राजे ।।**
**पूरन गुर पाए पुरबि लिखाए सभ निधि दीन दइआल ।।**
**आदि मधि अंति प्रभु सोई सुंदर गुर गोपाला ।।**
**सूख सहज आनंद घनेरे पतित पावन साधू धूरा ।।**
**हरि मिले नराइण नानका मानोरथुो पूरा ।।४ ।।१ ।।३ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४५३)

**शब्दार्थ : बेधिआ** – वेधले; **दीठा** – पाहिला; **अंम्रितु** – अमृत; **वूढा** – वर्षाव झाला; **नाठे** – नष्ट झाले; **गोठे** – गाठ; **मजीठा** – गडद तांबडा; **भाते** – आवडते; **लडि लाइ** – जवळ केले; **पूरनो** – पूर्णपणे; **जाचे** – याचना; **जिउ** – ज्या प्रकारे; **निरारा** – निराळा; **डारा** – नष्ट केले; **ढाठी** – ढासळली, पडली; **धनेरे** – पुष्कळ.

**भावार्थ :** हे रामराया ! प्रभुचरणाने माझे हृदय वेधले आहे. आता रामराया मला तुझ्याशिवाय अन्य कोणतीही गोष्ट गोड वाटत नाही. संतजनांच्या संगतीत राहून प्रभू परमात्म्याची आराधना केल्याने प्रत्येक जीवामध्ये वास करत असलेल्या प्रभू परमात्म्याचे मला दर्शन झाले. प्रत्येक जीवाचे ठायी असलेला परमेश्वर पाहून माझ्या हृदयात अमृताचा वर्षाव होत आहे. त्या गुणनिधी प्रभू परमात्म्याचे गुणगान केल्याने सर्व दुःख नष्ट झाले. अहंकाराची गाठ तुटली. सहजावस्थेत राहून प्रिय प्रभूस दृढतापूर्वक धारण केल्यास तो कधीही सोडून जात नाही. उलट अशा भक्ताचे हृदय भक्तिभावाच्या गडद लाल रंगात रंगून जाते. नानक सांगतात, हरिचरणकमलाशिवाय अन्य काहीही मला गोड वाटत नाही. ।।१ ।। हे प्रभो ! ज्याप्रमाणे पाण्यात मासोळी आनंदाने रममाण होते. त्याप्रमाणे रामरंगात माझे मन रमून गेले आहे. ज्यास पूर्णगुरूने नामस्मरणाचा उपदेश दिला, तो रामनामात रंगून जाऊन आपले जीवन व्यतीत करतो. प्रत्येक जीवाच्या हृदयातील भाव जाणणारा तो प्रभू परमात्मा अशा रामनामात रंगून गेलेल्या जीवास आपल्या चरणी आश्रय देतो. ज्याच्या हृदयात प्रभुनामरूपी रत्न प्रगट झाले, तो त्या प्रभुनामापासून कधीही दूर जात नाही. तो प्रभू परमात्मा सुंदर, सुस्वरूप व सुज्ञ आहे. त्याने दिलेले दान हे कधीही संपत नाही. नानक सांगतात, ज्या प्रमाणे मासोळी पाण्यात आनंदाने विहार करते, त्याप्रमाणे मी सदैव प्रभुनामात तल्लीन होऊन राहतो. ।।२ ।। ज्याप्रमाणे चातक पक्षी स्वाती नक्षत्राच्या जलबिंदूसाठी आसुसलेला असतो, तोच त्याचा आधार असतो, त्याप्रमाणे खऱ्या प्रभुभक्ताचा प्रभुनामही जीवनाधार असतो. धन संपत्ती, पुत्र, मित्र, बंधू ह्या सर्वांपेक्षा त्यास प्रिय असलेला प्रभूराम परमात्मा हा सर्वांपेक्षा आगळा-वेगळा आहे. त्याची गतिविधी, त्याची कार्यशैली कोणीही जाणत नाही. असा भक्त श्वास घेताना, घास घेताना, काहीही करत असला तरी त्याच्या मनास प्रभुनामाचा कधीही विसर पडत नाही. असे असले तरी सतगुरूच्या उपदेशानेच खरा आत्मिक आनंद प्राप्त होतो. संतजन त्या परमपुरुष परमात्म्याचे,

त्या जगाला जीवन देणाऱ्या प्रभू परमात्म्याचे नामामृत प्राशन करतात. प्रभुनामाच्या जपाने मोहमायेने उत्पन्न केलेले सारे भ्रम, सारे मोह, सारे दु:ख नष्ट होते. नानक सांगतात, ज्या प्रमाणे चातक पक्षास स्वातीच्या जलबिंदूविषयी प्रेम वाटते, त्या प्रमाणेच मला प्रभुनाम प्रिय वाटते. ॥३॥ ज्या प्रभुसेवकास प्रभू परमात्मा प्राप्त झाला त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. शूर सतगुरू भेटल्याने मनातील सारे भ्रम, सारी भीती नष्ट होते. ज्याच्या मस्तकी त्या दीनदयाळ प्रभू परमात्म्याने तसा भाग्यलेख पूर्वीच लिहिला असेल त्यासच पूर्णगुरूची प्राप्ती होते. तो प्रभू परमात्मा सर्व सृष्टीच्या आधीही अस्तित्वमान होता. आजही साऱ्या सृष्टीत तो व्याप्त होऊन राहिला आहे व ह्या सृष्टीचा अंत झाल्यावरही तो अस्तित्वात असणार आहे. संतजनांचे चरणरज पतितांना पावन करते. संतजनांची चरणधूळ मस्तकी धारण केल्याने सहजावस्था प्राप्त होते व आत्मिक सुखरूपी परमानंद प्राप्त होतो. नानक सांगतात, जो प्रभू परमात्म्याशी एकरूप झाला, त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. ॥४॥१॥३॥

**॥ आसा महला ५ छंत घरु ६ ॥**

**१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥**

(ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.)

**॥ सलोकु ॥ जा कउ भए क्रिपाल प्रभ हरि हरि सेई जपात ॥**
**नानक प्रीति लगी तिन्ह राम सिउ भेटत साध संगात ॥१॥**
**॥ छंतु ॥ जल दुध निआई रीति अब दुध आच नही मन ऐसी प्रीति हरे ॥**
**अब उरझिओ अलि कमलेह बासन माहि मगन इकु खिनु भी नाहि टरै ॥**
**खिनु नाहि टरीऐ प्रीति हरीऐ सीगार हभि रस अरपीऐ ॥**
**जह दूखु सुणीऐ जम पंथु भणीऐ तह साधसंगि न डरपीऐ ॥**
**करि कीरति गोविंद गुणीऐ सगल प्राछत दुख हरे ॥**
**कहु नानक छंत गोविंद हरि के मन हरि सिउ नेहु करेहु ऐसी मन प्रीति हरे ॥१॥**
**जैसी मछुली नीर इकु खिनु भी ना धीरे मन ऐसा नेहु करेहु ॥**
**जैसी चात्रिक पिआस खिनु खिनु बुंद चवै बरसु सुहावे मेहु ॥**
**हरि प्रीति करीजै इहु मनु दीजै अति लाईऐ चितु मुरारी ॥**
**मानु न कीजै सरणि परीजै दरसन कउ बलिहारी ॥**
**गुर सुप्रसंने मिलु नाह विछुंने धन देदी साचु सनेहा ॥**
**कहु नानक छंत अनंत ठाकुर के हरि सिउ कीजै नेहा मन ऐसा नेहु करेहु ॥२॥**
**चकवी सूर सनेहु चितवै आस घणी कदि दिनीअरु देखीऐ ॥**
**कोकिल अंब परीति चवै सुहावीआ मन हरि रंगु कीजीऐ ॥**
**हरि प्रीति करीजै मानु न कीजै इक राती के हभि पाहुणिआ ॥**
**अब किआ रंगु लाइओ मोहु रचाइओक नागे आवण जाणणिआ ॥**
**थिरु साधू सरणी पड़ीऐ चरणी अब टूटसि मोह जु कितीऐ ॥**

**कहु नानक छंत दइआल पुरख के मन हरि लाइ परीति कब दिनीअरु देखीऐ ।।३ ।।**
**निसि कुरंक जैसे नाद सुणि स्त्रवणी हीउ डिवै मन ऐसी प्रीति कीजै ।।**
**जैसी तरुणि भतार उरझी पिरहि सिवै इहु मनु लाल दीजै ।।**
**मनु लालहि दीजै भोग करीजै हभि खुसीआ रंग माणे ।।**
**पिरु अपना पाइआ रंगु लालु बणाइआ अति मिलिओ मित्र चिराणे ।।**
**गुरु थीआ साखी ता डिठमु आखी पिर जेहा अवरु न दीसै ।।**
**कहु नानक छंत दइआल मोहन के मन हरि चरण गहीजै ऐसीक मन प्रीति कीजै ।।४ ।।१ ।।४ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४५४)

**शब्दार्थ : भए** – झाला; **जल दुध निआय** – पाणी दूध न्याय, नीरक्षीर न्याय; **आच** – आंच, धग, उष्णता; **उरझिओ** – अनुरक्त होणे; **अलि** – भ्रमण; **बासन** – सुवासात; **मगन** – मग्न; **टरै** – दूर होणे; **सीगार** – शृंगार; **डरमीऐ** – घाबरणे; **प्राछत** – पाप; **छन्त** – छंद, एक काव्यप्रकार, ह्यात प्रत्येक कडव्यात सहा चरण असतात; **मेहु** – मेघ; **अति** – अत्यंत; **मानु** – गर्व; **परिजै** – पडणे, लोटांगण घालणे; **विछुंने** – वियोग, दूर होणे; **धन** – पत्नी; **चकवी** – चकवी पक्षीण; **सूर** – सूर्य; **चितवै** – चिंतन; **आस** – आशा; **दिनिअरु** – दिनकर, सूर्य; **अंब** – आम्र, आंबा; **परीति** – प्रीती; **चवै** – बोलते; **पाहुणिआ** – पाहुणे; **नागे** – नागवा; **थिरु** – स्थिर, स्थैर्य; **निसि** – रात्री; **कुरंक** – हरिण; **हिउ** – हृदय; **डिवै** – **आकर्षित होते. भतार** – पती; **उरझी** – मग्न होणे; **सितै** – सेवा करणे; **लालहि** – अर्पण; **हभि** – सर्व; **चिराणे** – पूर्वीपासूनचा; **साखी** – साक्षी; **डिठमु** – पाहणे; **जेहा** – जसा, सारखा; **गहीजै** – ग्रहण कर.

**भावार्थ :** ज्यांच्यावर प्रभू परमात्म्याची कृपा होते, ते प्रभुनामाच्या जपात तल्लीन होतात. नानक सांगतात, संतजनांच्या संगतीनेच प्रभुभक्तीची आवड निर्माण होते. ।।१ ।।छंत ।। जीवात्मा व परमात्मा ह्यांचे नाते दूध व पाणी यांच्यासारखे आहे. पाणी अग्नीचा ताप दुधास पोहोचू देत नाही. त्याप्रमाणे प्रभू परमात्मा आपल्या भक्तांना विषयविकारांचा दाह लागू देत नाही. ज्याप्रमाणे भ्रमर कमलाच्या सुगंधाने मोहित होऊन सदैव त्याच्या भोवती रुंजी घालत राहतो एक क्षणभरही त्यापासून दूर जात नाही, त्याचप्रमाणे हे जीवा तू प्रभुभक्तीपासून क्षणभरही ढळू नकोस. सर्व प्रकारचे सुखोपभोग, सारा शृंगार त्या प्रभू परमात्म्याच्या चरणी अर्पण कर. जरी दु:ख सहन करावे लागले, अगदी यमाच्या दारातही जावे लागले तरी संतसज्जनांच्या संगतीत राहाणारा जीव घाबरत नाही. प्रभू परमात्म्याच्या कीर्ती गायनाने सर्व पाप, सर्व दु:ख नष्ट होते. नानक सांगतात, हे जीवा ! तू प्रभू परमात्म्याचे भक्तिगीत गा. आपल्या मनात प्रभू विषयक प्रेमभाव दृढतापूर्वक धारण कर. ।।१ ।। ज्याप्रमाणे मासोळी पाण्यापासून एक क्षणही दूर राहू शकत नाही, त्याप्रमाणे हे जीवा ! तू प्रभू परमात्म्याशी असे प्रेमाचे नाते जोड की त्याच्याशिवाय तू एक क्षणही धीर धरू शकणार नाही. ज्याप्रमाणे चातक स्वातीच्या थेंबाकरिता आसुसलेला असतो व तो सतत पियू पियू असा धावा करत असतो तितक्या आर्ततेने तू प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. तू अभिमान सोड आणि विनम्र होऊन प्रभुचरणांवर लोटांगण घाल. त्याच्यावर आपले सर्वस्व समर्पित कर. जीवस्त्रीने अंत:करणपूर्वक प्रभुपतीवर प्रेम केले, तर सतगुरू प्रसन्न होऊन जीवात्म्याचे मिलन घडवून आणतो. हे मना वर दिलेल्या उदाहरणाप्रमाणे (मासा, चातक) तू त्या अनंत प्रभू परमात्म्यावर इतके अत्यंतिक प्रेम कर. ।।२ ।। ज्याप्रमाणे चकवी पक्षाला सूर्यदर्शनाची ओढ लागलेली असते केव्हा एकदा मला सूर्यदर्शन होते असे त्यास वाटत असते. कोकिळेचे जसे आम्रवृक्षावर प्रेम असते. आम्रवृक्षचा मोहोर पाहून ज्याप्रमाणे ती गोड ध्वनी उच्चारते, त्याप्रमाणे तूही प्रभूच्या प्रेम रंगात रंगून जा. अरे जीवा ! आपण सर्वजण ह्या संसारात घडीभराचे पाहुणे आहोत. हे जाणून तू प्रभू परमात्म्यावर प्रेम कर. कशाला ह्या संसाराच्या मोहात रंगून जातोस ?

अरे तू ह्या संसारात नागवाच आलास व तसाच येथून काहीही न घेताच जाणार आहेस. साधुसंतांना शरण गेल्याने तुझ्या मनातील संसाराचा मोह नष्ट होईल व तुझे चित्त स्थिर होईल. नानक सांगतात, हे जीवा ! तू त्या दयाळू प्रभू परमात्म्याची स्तुति स्तोत्रे गा. प्रभू परमात्म्यावर अनन्यभावाने प्रेम कर तरच तुला त्या परमात्मारूपी सूर्याचे दर्शन होईल. ॥३॥ ज्याप्रमाणे रात्री हरीण नाद ऐकून त्याकडे आकर्षित होते व आपले हृदय त्यास अर्पण करते त्याप्रमाणे तू प्रभू परमात्म्यावर प्रेम कर. ज्याप्रमाणे एखादी तरुणी आपल्या पतीशी एकरूप होऊन त्याच्यावर प्रेम करते व त्यास आपले सर्वस्व अर्पण करते, आपले मन पतीस अर्पण करून त्याचा संगाचा आनंद उपभोगते, त्याप्रमाणे, हे जीवा ! तुझे हृदय आपल्या प्रभुपतीस अर्पण कर. अशा प्रकारे तू आपल्या अनंत काळापासूनचा मित्र असलेल्या प्रभुपतीस प्राप्त कर. जर सतगुरू साक्षीला असेल तर तू अन्य कोणासही न दिसणाऱ्या प्रभू परमात्म्यास प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहू शकशील. नानक सांगतात, हे जीवा ! त्या दयाळू मनमोहनाचे चरण आपल्या हृदयात दृढ होतील असे प्रेम तू प्रभू परमात्म्यावर कर. ॥४॥१॥४॥

**॥ आसा महला ५ ॥**

**॥ सलोकु ॥ बनु बनु फिरती खोजती हारी बहु अवगाहि ॥**
**नानक भेटे साध जब हरि पाइआ मन माहि ॥१॥**
**॥ छंत ॥ जा कउ खोजहि असंख मुनी अनेक तपे ॥**
**ब्रहमे कोटि अराधहि गिआनी जाप जपे ॥**
**जप ताप संजम किरिआ पूजा अनिक सोधन बंदना ॥**
**करि गवनु बसुधा तीरथह मजनु मिलन कउ निरंजना ॥**
**मानुख बनु तिनु पसू पंखी सगल तुझहि अराधते ॥**
**दइआल लाल गोबिंद नानक मिलु साधसंगति होइ गते ॥१॥**
**कोटि बिसन अवतार संकर जटाधार ॥**
**चाहहि तुझहि दइआर मनि तनि रुच अपार ॥**
**अपार अगम गोबिंद ठाकुर सगल पूरक प्रभ धनी ॥**
**सुर सिध गण गंधरब धिआवहि जख किंनर गुण भनी ॥**
**कोटि इंद्र अनेक देवा जपत सुआमी जै जै कार ॥**
**अनाथ नाथ दइआल नानक साधसंगति मिलि उधार ॥२॥**
**कोटि देवी जा कउ सेवहि लखिमी अनिक भाति ॥**
**गुपत प्रगट जा कउ अराधहि पउण पाणी दिनसु राति ॥**
**नखिअत्र ससीअर सूर धिआवहि बसुध गगना गावए ॥**
**सगल खाणी सगल बाणी सदा सदा धिआवए ॥**
**सिम्रिति पुराण चतुर बेदह खटु सासत्र जा कउ जपाति ॥**
**पतित पावन भगति वछल नानक मिलीऐ संगि साति ॥३॥**
**जेती प्रभू जनाई रसना तेत भनी ॥**
**अनजानत जो सेवै तेती नह जाइ गनी ॥**

**अविगत अगनत अथाह ठाकुर सगल मंझे बाहरा ॥**
**सरब जाचिक एकु दाता नह दूरि संगी जाहरा ॥**
**वसि भगत थीआ मिले जीआ ता की उपमा कित गनी ॥**
**इहु दानु मानु नानकु पाए सीसु साधह धरि चरनी ॥४॥२॥५॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४५५)

**शब्दार्थ : बनु** – वनात; **हारी** – हरलो, थकलो; **अवगाही** – शोधून; **तपे** – तपस्वी; **किरिआ** – क्रिया, कर्मकांड; **सोधन** – शुद्धी; **क्रीया** – गुंतून जाणे; **वसुधा** – पृथ्वी; **तिनु** – तृण, गवत; **गते** – मुक्ती; **बिसन** – विष्णू; **संकर** – शंकर; **चाहहि** – इच्छितात; **रुच** – रुची; **पूरक** – पूर्ण करणारा; **जख** – यक्ष; **किनर** – किन्नर; **उधार** – उद्धार; **लखिमी** – लक्ष्मी; **नखिअत्र** – नक्षत्र; **ससीअर** – शशिधर, चंद्र; **बसुध** – पृथ्वी; **गावए** – गातात; **बेहद** – वेद; **खटु** – सहा; **सासत्र** – शास्त्र; **अनजानत** – अज्ञात; **अविगत** – अव्यक्त; **अनगत** – अगणित; **अथाह** – अथांग; **मुझे** – मध्ये; **बाहरा** – बाहेर; **जाचिक** – याचक; **जाहरा** – समक्ष; **कितगंनी** – किती सांगू; **सीसु** – मस्तक; **साधह** – साधूंचे.

**भावार्थ :** (श्लोक) जीवस्त्री प्रभू परमात्म्यास शोधण्यासाठी रानावनात भटकत फिरली. शोध घेता घेता थकून गेली. पण नानक सांगतात, जेव्हा तिला साधुसंतांची संगत प्राप्त झाली, तेव्हा तो प्रभू परमात्मा तिला तिच्या मनातच भेटला. ॥१॥(छंत) असंख्य मुनी, अनेक तपस्वी ज्याचा शोध घेत आहेत. कोटी कोटी ब्रह्मदेव ज्याची आराधना करतात, ज्याचा जप करतात, त्या प्रभू परमात्म्याच्या प्राप्तीसाठी सारे जग, नाना तऱ्हेचे जप, तप, संयम, क्रियाकर्म, पूजा अनेक शुद्धिक्रिया, वंदना आदीचे आचरण करतात, त्या निरंजन प्रभू परमात्म्यास प्राप्त करण्यासाठी तीर्थात स्नान करतात, नानक म्हणतात. साधुसंतांच्या संगतीने मला तो दयाघन प्रभू परमात्मा प्राप्त व्हावा व त्यामुळे मला मुक्ती प्राप्त व्हावी. ॥१॥ कोटी कोटी विष्णू, त्याने धारण केलेले अवतार, जटाधारी शंकर ही तन मन:पूर्वक तुझ्याच प्राप्तीची कामना करतात. तो अपार, अगम्य सर्वांचा स्वामी, सर्वांच्या सर्व मनोकामना परिपूर्ण करतो. सर्व देव, सिद्ध, गण, गंधर्व त्याचेच स्मरण करतात. यक्ष, किन्नरही त्याचेच गुणगान गातात. कोटी कोटी इंद्र, अनेकानेक देवगण हे स्वामी प्रभू परमात्मा तुझेच नामस्मरण करतात. तुझाच जयजयकार करतात. नानक सांगतात, तो अनाथांचा नाथ तो दयाघन प्रभू परमात्मा साधुसंतांच्या संगतीत प्राप्त होतो व तो जीवांचा उद्धार करतो. ॥२॥ कोटी कोटी देव, लक्ष्मी अनेक प्रकाराने त्याची सेवा करतात. प्रगटपणे वा अप्रगटपणे वाहणारे वारे, पाणी रात्रंदिवस ज्याचे नामस्मरण करतात; सर्व नक्षत्रे, सूर्य, चंद्र, पृथ्वी आकाश ज्याचे सदैव ध्यान करतात; सर्व योनी, सर्व भाषा ज्याचे सदैव गुणगान गातात, सर्व स्मृती, षट्शास्त्रे, पुराणे, चारही वेद ज्याचा जप करतात असा पतितपावन, भक्तवत्सल प्रभू परमात्मा साधुसंतांच्या संगतीने प्राप्त होतो, असे नानक सांगतात. ॥३॥ ज्यास प्रभू परमात्म्याने जितके ज्ञान दिले, त्याची वाणी प्रभू परमात्म्याचे तितकेच वर्णन करू शकते. मला प्रभू परमात्म्याने जेवढे ज्ञान दिले तितकेच मी माझ्या जिव्हेने तुम्हास सांगितले. जे माझ्या ज्ञानापलिकडे आहे, ते मला माहीत नाही. अनेक जण अनेक प्रकारे प्रभू परमात्म्याची भक्ती-सेवा करत असतात. पण त्यांचे वर्णन मी करू शकत नाही. तो प्रभू परमात्मा अव्यक्त आहे. अनंत आहे, अथांग आहे. पण असे असले तरी तो सर्व वस्तुमात्रात भरून राहिला आहे. तो सर्वव्याप्त असूनही सर्वांपासून अलिप्त आहे. तो एकमात्र दाता आहे. बाकी सारे याचक आहेत. तो जीवापासून मुळीच दूर नाही. तो सर्वत्र सर्वांच्यातच प्रत्यक्ष सामावलेला आहे. त्यास भक्तीने वश करता येते. जो जीव त्यास प्राप्त करतो, त्याची महती किती म्हणून सांगू! नानक सांगतात, प्रभूने माझ्यावर कृपा करावी. मला एकच दान एकच मान प्राप्त व्हावा की प्रभूच्या सेवकांच्या चरणी मी माझे मस्तक विनम्र करावे. ॥४॥२॥५॥

॥ आसा महला ५ ॥

॥ सलोक ॥ उदमु करहु वडभागीहो सिमरहु हरि हरि राइ ॥
नानक जिसु सिमरत सभ सुख होवहि दूखु दरदु भ्रमु जाइ ॥१ ॥
॥ छंतु ॥ नामु जपत गोबिंद नह अलसाईऐ ॥
भेटत साधू संग जम पुरि नह जाइऐ ॥
दूख दरद न भउ बिआपै नामु सिमरत सद सुखी ॥
सासि सासि अराधि हरि हरि धिआइ सो प्रभु मनि मुखी ॥
क्रिपाल दइआल रसाल गुण निधि करि दइआ सेवा लाईऐ ॥
नानकु पइअंपै चरण जंपै नामु जपत गोबिंद नह अलसाईऐ ॥१ ॥
पावन पतित पुनीत नाम निरंजना ॥
भरम अंधेरे बिनास गिआन गुर अंजना ॥
गुर गिआन अंजन प्रभ निरंजन जलि थलि महीअलि पूरिआ ॥
इक निमख जा के रिदै वसिआ मिटे तिसहि विसूरिआ ॥
अगाधि बोध समरथ सुआमी सरब का भउ भंजना ॥
नानकु पइअंपै चरण जंपै पावन पतित पुनीत नाम निरंजना ॥२ ॥
ओट गही गोपाल दइआल क्रिपा निधे ॥
मोहि आसर तुअ चरन तुमारी सरनि सिधे ॥
हरि चरन कारन करन सुआमी पतित उधरन हरि हरे ॥
सागर संसार भव उतार नामु सिमरत बहु तरे ॥
आदि अंति बेअंत खोजहि सुनी उधरन संतसंग बिधे ॥
नानकु पइअंपै चरन जंपै ओट गही गोपाल दइआल क्रिपा निधे ॥३ ॥
भगति वछलु हरि बिरदु आपि बनाइआ ॥
जह जह संत अराधहि तह तह प्रगटाइआ ॥
प्रभि आपि लीए समाइ सहजि सुभाइ भगत कारज सारिआ ॥
आनंद हरि जस महा मंगल सरब दूख विसारिआ ॥
चमतकार प्रगासु दह दिस एकु तह द्रिसटाइआ ॥
नानकु पइअपै चरण जंपै भगति वछलु हरि बिरदु आपि बनाइआ ॥४ ॥३ ॥६ ॥

(श्री. गु. ग्रं. सा. ४५६)

**शब्दार्थ : उदमु** – उद्योग; **तडभागीहो** – भाग्यवंतांनो; **नह** – नका; **अलसाइऐ** – आळस; **लाइऐ** – लाव; **पइअंपै** – सांगतात; **विसुरिआ** – नाहीसे झाले; **आसर** – आसरा, आश्रय; **ओट** – शरण; **गही** – ग्रहण केले, गेला; **सिधे** – सिद्धी, सफलता; **बिधे** – विधी, मार्ग; **सारिआ** – पूर्ण केले; **बिरदु** – ब्रीद; **बनाइआ** – धारण केले.

**भावार्थ :** ॥श्लोक॥ हे भाग्यशाली जीवांनो आपापला उद्योग करत असताना त्या हरीचे प्रभू परमात्म्याचे स्मरण करा. नानक सांगतात, प्रभू परमात्म्याचे स्मरण केल्याने सर्व दु:ख, कष्ट, भ्रम नष्ट होऊन सर्व सुखाची प्राप्ती होते. ॥१॥छंत॥ त्या गोविंदाचे, प्रभू परमात्म्याचे स्मरण करण्यात मुळीच आळस करू नका. प्रभूचे स्मरण केल्याने साधुसंतांची भेट होऊन यमलोकीचे फेरे बंद होतात. नामस्मरणाने मोहमायेमुळे प्राप्त होणारे दु:ख, भ्रम मनाला व्यापू शकत नाही व जीवास आत्मिक सुखाचा लाभ होतो. हे जीवा ! तू प्रत्येक श्वासागणिक प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. तुझ्या मनात तू त्यास सदैव धारण कर. मुखाने प्रभुनामाचे उच्चारण कर. हे कृपाळू, दयाळू, रसज्ञ, गुणनिधी प्रभू, माझ्यावर दया करून मला तुझी सेवा करण्याची बुद्धी दे. नानक सांगतात, हे जीवा ! त्या प्रभू परमात्म्याच्या चरणसेवेत, त्या गोविंदाच्या नामस्मरणात कधीही आळस करू नकोस. ॥१॥ निरंजन प्रभूचे नाम पवित्र आहे. त्याच्या नामस्मरणाने पतित ही पावन होतात. सतगुरूकडून प्राप्त झालेल्या ज्ञानांजनाने सारे भ्रम नष्ट होतात. अज्ञान, अंधकार दूर होतो. सतुगुरूकडून प्राप्त झालेल्या ज्ञानांजनाने तो मायातीत प्रभू जळी-स्थळी अंतराळी सर्वत्र पूर्णपणे भरून राहिला आहे हे कळून येते. ज्याच्या हृदयात एक क्षणभर का होईना त्या प्रभू परमात्म्याचा वास झाले त्यांचे सर्व दु:ख, क्लेश, चिंता नष्ट होतात. तो सर्वसमर्थ स्वामी अगाध ज्ञानी आहे. तो सर्वांचे भय नष्ट करतो. नानक सांगतात, त्या पतितांना पावन करणाऱ्या प्रभूच्या पवित्र चरणांचे त्याच्या पवित्र नामाचे सदैव स्मरण करावे.॥२॥ हे जगाच्या पालनकर्ता, हे दयासागर प्रभू, हे कृपानिधी प्रभू ! मी तुझ्या चरणांत आश्रय ग्रहण केला आहे. मला तुझ्या चरणी आश्रय दे. मी तुला शरण आलो आहे. त्या कर्त्याकरवित्या प्रभू परमात्म्यचे चरणकमल हे पतितांचा उद्धार करणारे आहेत. हे प्रभो ! तुझ्या नामस्मरणाने जीवात्मा भवसागर, संसारसागर पार करून जातो. अनेक जीव नामस्मरणाने तरून गेले आहेत. जगाच्या सुरुवातीपासून अंतापर्यंत, जन्मल्यापासून मृत्यूपर्यंत सर्वलोक तुझाच शोध घेत असतात. संतसंगतीने आत्मोद्धाराचा मार्ग प्राप्त होतो. नानक सांगतात, हे जीवा ! तू त्या जगपालक दयाळू कृपानिधी प्रभू परमात्म्याच्या चरणांचा आश्रय घेऊन प्रभुनामाचा सदैव जप कर. ॥३॥ हे प्रभो ! तू स्वत:च भक्तवत्सल हे ब्रीद धारण केले आहेस. जेथे जेथे संतजन तुझे स्मरण करतात तेथे तेथे तो प्रगट होतो. हे प्रभो ! तूच भक्तांना आपल्यात सामावून घेतोस. भक्तांचे कार्यही तू सफल करतोस, सिद्धीस नेतोस. त्यामुळे भक्तांच्या मनात सर्वत्र आनंदीआनंद भरून जातो. त्याच्या हृदयात सदैव मंगल वाद्ये वाजू लागतात. त्यास सर्व दु:खाचा विसर पडतो आणि तो एक चमत्कार अनुभवतो. त्यास दाही दिशांना एकमेव प्रभू परमात्माच दिसू लागतो. नानक सांगतात, हे जीवा ! तू सदैव प्रभुचरणांचे स्मरण कर कारण प्रभू परमात्मा भक्तवत्सल आहे. त्याने स्वत:च हे बिरुद धारण केले आहे. ॥४॥३॥६॥

**॥ आसा महला ५ ॥**

**थिरु संतन सोहागु मरै न जावए॥**
**जा कै ग्रिहि हरि नाहु सु सद ही रावए॥**
**अविनासी अविगतु सो प्रभु सदा नवतनु निरमला॥**
**नह दूरि सदा हदूरि ठाकुरु दह दिस पूरनु सद सदा॥**
**प्रानपति गति मति जा ते प्रिअ प्रीति प्रीतमु भावए॥**
**नानकु वखाणै गुर बचनि जाणै थिरु संतन सोहागु मरै न जावए॥१॥**
**जा कउ राम भतारु ता कै अनुद घणा॥**
**सुखवंती सा नारि सोभा पूरि बणा॥**
**माणु महतु कलिआणु हरि जसु संगि सुरजनु सो प्रभू॥**

**सरब सिधि नव निधि तितु ग्रिहि नही ऊना सभु कछू ।।**
**मधुर बानी पिरहि मानी थिरु सोहागु ता का बणा ।।**
**नानकु वखाणै गुर बचनि जाणै जा को रामु भतारु ता कै अनदु घणा ।।२ ।।**
**आउ सखी संत पासि सेवा लागीऐ ।।**
**पीसउ चरण पखारि आपु तिआगीऐ ।।**
**तजि आपु मिटै संतापु आपु नह जाणाईऐ ।।**
**सरणि गहीजै मानि लीजै करे सो सुखु पाईऐ ।।**
**करि दास दासी तजि उदासी कर जोड़ि दिनु रैणि जागीऐ ।।**
**नानकु वखाणै गुर बचनि जाणै आउ सखी संत पासि सेवा लागीऐ ।।३ ।।**
**जा कै मसतकि भाग सि सेवा लाइआ ।।**
**ता की पूरन आस जिन्ह साधसंगु पाइआ ।।**
**साध संगि हरि कै रंगि गोबिंद सिमरण लागिआ ।।**
**भरमु मोहु विकारु दूजा सगल तिनहि तिआगिआ ।।**
**मनि सांति सहजु सुभाउ वूठा अनद मंगल गुण गाइआ ।।**
**नानकु वखाणै गुर बचनि जाणै जा कै मसतकि भाग सि सेवा लाइआ ।।४ ।।४ ।।७ ।।**

(श्री. गु. ग्रं. सा. ४५७)

**शब्दार्थ : सोहागु –** सौभाग्य; **जाकै –** ज्याच्या; **नाहु –** नाश, पतन; **नवतनु –** नवीन; **अविगतु –** अव्यक्त; **वखाणै –** सांगतात; **माणु –** मानसन्मान; **महतु –** महती, मोठेपणा; **सुरजनु –** सतगुणी; **पीसउ –** दळण दळा; **पखारि –** धुवून; **आपु –** अहंकार; **तिआगिऐ –** त्याग करा; **जाणाइआ –** जाणवणे; **जागीऐ –** जागृत राहा; **भाग –** भाग्य; **दूजा –** द्वैतभाव; **वूठा –** वास केला.

**भावार्थ :** संतजनांचे सौभाग्य कायम राहते. स्थिर असते कारण त्यांचा पती, प्रभू परमात्मा अमर आहे, सदैव अस्तित्वमान आहे. त्यांच्या हृदयात प्रभुपती वास करतो व ते त्याच्याशी सदैव रममाण होतात. तो प्रभुपती अविनाशी आहे. अव्यक्त आहे. तो सदैव नित्य नूतन व निर्मल आहे. तो प्रभुपती स्वामी कधीही दूर नसतो. सदैव जवळच असतो. तो दशदिशा व्यापून राहिला आहे. तो प्राणाचा स्वामी जीवास बुद्धी प्रदान करतो, मुक्तीही देतो. जो जो त्या प्रिय प्रभुपतीवर अधिक प्रेम करावे, तो तो ती प्रियतमा त्यास अधिक आवडू लागते. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशाने त्याचे ज्ञान प्राप्त होते व संतजन त्याच्याशी एकरूप होऊन शांत होतात. त्यांचे सौभाग्य स्थिर असते अखंड असते. ते कधीच नष्ट होत नाही ।।१ ।। ज्या कोणा जीवस्त्रीस प्रभुराम पती म्हणून प्राप्त झाला तिला अनंत आनंद प्राप्त होतो. ती स्त्री सदैव सुखी असते व ती प्रभुचरणी पूर्ण सन्मान प्राप्त करते. तिला प्रभुपतीचे यश प्रेम प्राप्त झाल्यामुळे तिला मानसन्मान, महती, क्षेम प्राप्त होते व तिला त्या सतगुणी प्रभुपतीचा संग सदैव प्राप्त होतो. तिच्या हृदयात सर्व सिद्धी, नऊ निधी प्रगट होतात. तिला जीवनात कशाचीही कमतरता राहत नाही. प्रिय पतीकडून प्रभू परमात्म्याकडून सन्मान प्राप्त झाल्यामुळे तिची वाणी मधूर बनते व तिचे सौभाग्य स्थिर राहते. नानक सांगतात, सतगुरूकडून ज्या जीवस्त्रीला प्रभुराम पती प्राप्त होतो, तिच्या आनंदाला पारावार राहत नाही ।।२ ।। सख्यांनो या ! संतजनांच्या सेवेस लागू ! पाय धुऊ. आपल्या अहंकाराचा त्याग करून त्यांच्या घरी दळण दळू, त्यांचे पाय धुऊ. अहंकाराचा त्याग केल्याने सर्व कष्ट, संताप नष्ट होतात व मनात अहंभाव कधीही प्रगट

होत नाही. त्या प्रभू परमात्म्यास शरण जा. त्याच्या इच्छेचा आदर कर. तो जे करील त्यात आनंद मान. असे केल्याने तू सुखी होशील. तू जगाच्या व्यवहारापासून विरक्त होऊन प्रभू परमात्म्याच्या दासाचा दासी हो. त्याच्या पुढे दोन्ही कर जोडून रात्रंदिवस त्याच्या सेवेसाठी तत्पर राहा. नानक सांगतात, सतगुरू उपदेशानेच हे ज्ञान प्राप्त होते. चला सख्यांनो ! आपण त्यांनी दाखवलेल्या मार्गाने प्रभू परमात्म्याच्या सेवेस लागू या ॥३॥ ज्याच्या भाग्यात असेल त्या जीवासच प्रभू परमात्मा भक्तिमार्गास लावतो. ज्यांना साधुसंतांची संगत प्राप्त झाली त्याच्या सर्व आशा पूर्ण होतात. संतजनांच्या संगतीने जीव प्रभूरंगात रंगून जातो व प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणास लागतो. असे जीव मोह, भ्रम, विकार सगळ्यांचा त्याग करतात. द्वैतभावाचाही त्याग करतात. त्यांना मन:शांती लाभते व ते सहजावस्था प्राप्त करून आनंदाने प्रभू परमात्म्याचे मंगल गुण गाऊ लागतो. नानक सांगतात, सतगुरूच्या उपदेशामुळे हे सारे ज्ञान प्राप्त होते. ज्याच्या भाग्यात असेल त्यासच सतगुरू प्रभू परमात्म्याच्या सेवेची प्रेरणा देतो. ॥४॥४॥७॥

**॥ आसा ५ ॥**

**सलोकु ॥ हरि हरि नामु जपंतिआ कछु न कहै जमकालु ॥**
**नानक मनु तनु सुखी होइ अंते मिलै गोपालु ॥१॥**
**॥ छंत ॥ मिलउ संतन कै संगि मोहि उधारि लेहु ॥**
**बिनउ करउ कर जोड़ि हरि हरि नामु देहु ॥**
**हरि नामु मागउ चरण लागउ मानु तिआगउ तुम्ह दइआ ॥**
**कतहूं न धावउ सरणि पावउ करुणामै प्रभ करि मइआ ॥**
**समरथ अगथ अपार निरमल सुणहु सुआमी बिनउ एहु ॥**
**कर जोड़ि नानक दानु मागै जनम मरण निवारि लेहु ॥१॥**
**अपराधी मतिहीनु निरगुनु अनाथु नीचु ॥**
**सठ कठोरु कुलहीनु बिआपत मोह कीचु ॥**
**मल भरम करम अहं ममता मरणु चीति न आवए ॥**
**बनिता बिनोद अनंद माइआ अगिआनता लपटावए ॥**
**खिसै जोबनु बधै जरूआ दिन निहारे संगि मीचु ॥**
**बिनवंति नानक आस तेरी सरणि साधु राखू नीचु ॥२॥**
**भरमे जनम अनेक संकट महा जोन ॥**
**लपटि रहिओ तिह संगि मीठे भोग सोन ॥**
**भ्रमत भार अगनत आइओ बहु प्रदेसह धाइओ ॥**
**अब ओट धारी प्रभ मुरारी सरब सुख हरि नाइओ ॥**
**राखनहारे प्रभ पिआरे मुझ ते कछू न होआ होन ॥**
**सूख सहज आनंद नानक क्रिपा तेरी तरै भउन ॥३॥**
**नाम धारीक उधारे भगतह संसा कउन ॥**
**जेन केन परकारे हरि हरि जसु सुनहु स्रवन ॥**

**सुनि स्रवन बानी पुरख गिआनी मनि निधाना पावहे ।।**
**हरि रंगि राते प्रभ बिधाते राम के गुण गावहे ।।**
**बसुध कागद बनराज कलमा लिखण कउ जे होइ पवन ।।**
**बेअंत अंतु न जाइ पाइआ गही नानक चरण सरन ।।४ ।।५ ।।८ ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४५७)

**शब्दार्थ : जपतिआ** – जप करणाऱ्यास; **अंते** – शेवटी; **देहु** – दे, प्रदान कर; **कतहु** – कोठेही; **एहू** – हीच; **सठ** – धूर्त, **सठ** – लबाड; **कीचु** – चिखल; **चीति** – चित्तात; **खिसै** – कमी होणे; **लपटावए** – फिरणे, व्याप्त होणे, घेरले जाणे; **बधै** – वाढत; **जरूआ** – वृद्धत्व; **मीचू** – मृत्यूचा; **सोन** – सोने; **प्रदेसह** – प्रदेश; **धाइओ** – धावलो; **होन** – होईल; **धारिक** – धारण करणे; **जेन केन** – येनकेन, कोणत्याही; **परकारे** – प्रकारे; **निधान** – खजिना, संपत्ती; **बसुध** – वसुधा, पृथ्वी; **कगद** – कागद; **बनराज** – वनस्पती; **कलमा** – लेखणी; **पवन** – पवन; **लिखन** – लेखक; **गही** – ग्रहण करणे.

**भावार्थ :** ।।श्लोक।। जो प्रभुसेवक हरिनामाचा जप करतो, त्यास यमाचे भय राहत नाही. काळ त्यास भिववू शकत नाही. नानक सांगतात, नामस्मरण केल्याने शेवटी प्रभू परमात्माशी मिलन होते. ।।छंत।। नानक म्हणतात, हे प्रभो ! मला संतजनांची संगतीने तुझी प्राप्ती होवो व माझा उद्धार होवो. मी हात जोडून तुला विनंती करतो की मला हरिनाम दे. हे प्रभू ! तुझ्या चरणी मस्तक ठेवून मी तुझ्या नामाची याचना करतो. माझ्यावर कृपा कर. हे समर्थ, अगाध, अपार निर्मल प्रभू तू जगाचा स्वामी आहेस. माझी ही विनंती ऐक. नानक कर जोडून तुझ्याकडे दान मागत आहे. माझी जन्ममरणाच्या चक्रातून सुटका कर. ।।१ ।। हे प्रभू ! मी अपराधी आहे, बुद्धिहीन आहे. गुणहीन आहे. अनाथ आहे. नीच आहे. मी लबाड, कठोर हृदयाचा व कुलहीन आहे. मी मोहमायेच्या चिखलात रुतून पडलो आहे. माझ्या मनात भ्रमरूपी कर्मकांडाचा मळ भरलेला आहे. अहंकार व संसाराच्या ओढीने मला मृंत्यूचाही विसर पडला आहे. मी स्त्रीसंगात रममाण झालो आहे. अज्ञानवश मायावी सुखाच्या आनंदाने लिप्त झालो आहे. यौवन हळूहळू नष्ट होत आहे. वृद्धत्व अधिक अधिक वाढत आहे. दिन प्रति दिन मृत्यू समीप येत आहे. हा तुझा क्षुद्र दास नानक तुझ्याचकडे आस लावून तुला विनवतो की, हे प्रभो ! मी तुला शरण आलो आहे, मला संतजनांच्या संगतीत ठेव. ।।२ ।। मी ह्या जगात अनेक वेळा जन्म घेतला. अनेक योनीतून जन्माचे महासंकट अनुभवले आहे. पण तरीही मी सोन्याच्या, धनाच्या, मायेच्या उपभोगात लिप्त होऊन त्यातच आनंद मानत आहे. अनेक पापांचा भार डोक्यावर धारण करून मी जन्ममरणाच्या चक्रात फिरत राहिलो आहे. पण आता, हे प्रभो ! मी तुझ्या आश्रयास आलो आहे. तुझ्या नामस्मरणाने आता मला सर्व सुखाची प्राप्ती झाली आहे. हे प्रिय प्रभू तू सर्व जीवांचा रक्षणकर्ता आहेस. आजपर्यंत मी काहीही करू शकलो नाही. पुढेही काही करू शकणार नाही. नानक सांगतात, तुझ्या कृपेने आत्मिक स्थिरता देणारी सहजावस्था प्राप्त झाली व त्यामुळे सुख व आनंदाची प्राप्ती झाली व तुझ्या कृपेनेच मी हा भवसागर तरून गेलो आहे. ।।३ ।। ज्या जीवांनी प्रभुनामाचे अगदी थोडेसे का होईना, स्मरण केले तेही या भवसागरातून पार झाले. म्हणून हे जीवा ! कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रभू परमात्म्याचे यशोगान तू तुझ्या कानानी ऐक. हे जीवा ! ज्ञानी पुरुषांकडून प्रभुकीर्तीची वाणी ऐक, त्यामुळे तुला नामरूपी निधीची प्राप्ती होईल. प्रभूच्या भक्तिरंगात रंगून जाऊन तू त्या विधात्या प्रभू परमात्म्याची गुणस्तोत्रे गा. तो प्रभू परमात्मा इतका अपार आहे की साऱ्या जमिनीचा कागद केला, साऱ्या वनस्पतींच्या लेखण्या केल्या व वायूने लेखक बनून त्याचे वर्णन लिहिण्याचा प्रयत्न केला, तरी प्रभूचा त्यास जराही पार लागणार नाही. नानक सांगतात, की मी प्रभुचरणी शरण गेलो आहे. ।।४ ।।५ ।।८ ।।

**॥ आसा महला ५ ॥**

**पुरख पते भगवान ता की सरणि नाही ॥**
**निरभउ भए परान चिंता सगल लही ॥**
**मात पिता सुत मीत सुरिजन इसट बंधप जाणिआ ॥**
**गहि कंठि लाइआ गुरि मिलाइआ जसु बिमल संत वखाणिआ ॥**
**बेअंत गुण अनेक महिमा कीमति कछू न जाइ कही ॥**
**प्रभ एक अनिक अलख ठाकुर ओट नानक तिसु गही ॥१ ॥**
**अंम्रित बनु संसारु सहाई आपि भए ॥**
**राम नामु उर हारु बिखु के दिवस गए ॥**
**गतु भरम मोह बिकार बिनसे जोनि आवण सभ रहे ॥**
**अगनि सागर भए सीतल साध अंचल गहि रहे ॥**
**गोविंद गुपाल दइआल संम्रिथ बोलि साधू हरि जै जए ॥**
**नानक नामु धिआइ पूरन साधसंगि पाई परम गते ॥२ ॥**
**जह देखउ तह संगि एको रवि रहिआ ॥**
**घट घट वासी आपि विरलै किनै लहिआ ॥**
**जलि थलि महीअलि पूरि पूरन कीट हसति समानिआ ॥**
**आदि अंते मधि सोई गुर प्रसादी जानिआ ॥**
**ब्रहमु पसरिआ ब्रहम लीला गोविंद गुण निधि जनि कहिआ ॥**
**सिमरि सुआमी अंतरजामी हरि एकु नानक रवि रहिआ ॥३ ॥**
**दिनु रैणि सुहावड़ी आई सिमरत नामु हरे ॥**
**चरण कमल संगि प्रीति कलमल पाप टरे ॥**
**दूख भूख दारिद्र नाठे प्रगटु मगु दिखाइआ ॥**
**मिलि साध संगे नाम रंगे मनि लोड़ीदा पाइआ ॥**
**हरि देखि दरसनु इछ पुंनी कुल संबूहा सभि तरे ॥**
**दिनसु रैणि अनंद अनदिनु सिमरंत नानक हरि हरे ॥४ ॥६ ॥९ ॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४५८)

**शब्दार्थ : पुरख पते** – सर्व जीवांचा स्वामी; **परान** – प्राण, श्वास; **लही** – नष्ट झाली, दूर झाली; **सुरिजन** – महान व्यक्ती; **इसट** – इष्ट; **बंधप** – बांधव; **जाणिआ** – मानले; **उरहारु** – गळ्यातील हार; **बिखु** – विषयविकार; **बोली** – बोलावे; **लहिआ** – जाणले; **कीट** – कीटक; **हसति** – हत्ती; **पसरिआ** – पसरलेला; **सुहावड़ी** – सुंदर; **कलमल** – विकार; **नाठे** – नष्ट झाले; **मगु** – मार्ग; **लोड़ीदा** – इच्छिलेले; **सबुहा** – संबंध.

**भावार्थ :** तो प्रभू परमात्मा सर्व जीवांचा स्वामी आहे. जे त्यास शरण जातात, त्यांच्या सर्व चिंता नष्ट होतात व ते निर्भय होतात. असे प्रभुभक्त प्रभू परमात्म्यासच आपले माता-पिता, पुत्र, मित्र, सुजन, हितचिंतक, बंधू सर्व काही तोच आहे असे मानतात. सतगुरूच्या माध्यमातून जेव्हा त्यांनी प्रभू परमात्म्यास प्राप्त केले तेव्हा त्याने त्यांना प्रेमाने आपल्या हृदयाशी

धरले. अशा प्रभू परमात्म्याच्या विमल यशाचे संतजन वर्णन करतात. तो प्रभू परमात्मा अनंत आहे. त्याचे गुण अनंत आहेत. त्याच्या महिम्याचे मोल कोणीही करू शकत नाही. तो प्रभू परमात्मा एकच आहे. ह्या सृष्टीत तो अनेक रूपाने प्रगट झाला आहे. पण तरीही तो दृष्टीला दिसत नाही. नानकने त्याचाच आश्रय घेतला आहे. ॥१॥ ज्या जीवाचा प्रभू परमात्मा स्वत: सहायक होतो त्यास सारा संसार अमृतमय वाटू लागतो, अमृताने भरलेला आहे असे वाटते. जो जीव प्रभुनामास आपल्या गळ्यातील हार मानतो, जो प्रभुनामाशी एकरूप झाला, त्याच्या जीवनातील विकारांचा विषारी कालखंड संपुष्टात येतो. मायारूप भ्रम, मोह, विषयविकारही नष्ट होतात. परत जन्मही घ्यावा लागत नाही. तो जन्ममरणाच्या चक्रातून मुक्त होतो. संतजनांचा आश्रय घेतल्याने विकाररूपी अग्नी शांत होतो. नानक सांगतात, हे जीवा ! तू पृथ्वीला धारण करणाऱ्या, सर्व जीवांचे पालन करणाऱ्या, त्या समर्थ प्रभू परमात्म्याचा व संतजनांचा जय जयकार कर. नानक सांगतात, जो सदैव प्रभुनामाचे स्मरण करतो त्यास पूर्णत्वास पोहोचलेल्या साधुसंतांची संगत प्राप्त होऊन त्यास परमगती, मुक्ती प्राप्त होते. ॥२॥ मी जिकडे पाहतो तिकडे तो एकमेव प्रभू परमात्मा सर्वत्र रममाण झालेला मला दिसतो. तो प्रभू परमात्मा सर्व जीवांचे ठायी वास करतो. पण क्वचितच कोणी हे जाणतो. जळी, स्थळी, अंतरिक्षात सर्वत्र, क्षुद्र कीटकापासून महाकाय हत्तीपर्यंत सर्व जीवांमध्ये तो प्रभू परमात्मा सामावलेला आहे. ह्या सृष्टीच्या निर्मितीपूर्वी, समस्त सृष्टीत आजही व सृष्टीच्या अंतानंतरही तो प्रभूच केवळ विद्यमान असणारा आहे. पण हे सत्य सतगुरुकृपेनेच समजते. ह्या ब्रह्मांडाचा पसारा ही सारी त्या प्रभू परमात्म्याचीच लीला आहे. त्यासच लोक गुणनिधी म्हणून ओळखतात. नानक सांगतात, हे जीवा ! सर्व काही जाणणाऱ्या त्या अंतर्यामी प्रभू परमात्म्याचे त्या एकमेव हरीचे स्मरण कर. तोच एकमेव प्रभू सर्वत्र रममाण झालेला आहे. ॥३॥ प्रभुनामाच्या सदैव स्मरणाने दिवस-रात्र सर्व काळ वेळ सुखदायक होतो. प्रभुचरणकमलाशी प्रीती जोडल्याने पाप व मनाचे सारे दोष नष्ट होतात. जन्ममरणाचे दु:ख, विषयविकारांची भूक व दुर्गुणरूप दारिद्र्य नष्ट होते व जीवनाचा योग्य मार्ग स्पष्ट दिसू लागतो. साधुसंतांच्या संगतीत नामस्मरणात रंगून गेल्याने मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. प्रभू परमात्म्याच्या दर्शनाने जीवाच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात व त्याच्या संपूर्ण कुलाचा उद्धार होतो. नानक सांगतात, सदैव प्रभू परमात्म्याचे नामस्मरण केल्याने दिवस-रात्र दैवी आनंद प्राप्त होतो. ।४॥६॥९॥

**॥ आसा महला ५ छंत घरु ७ ॥**

**१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥**

(ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.)

**॥सलोकु॥ सुभ चिंतन गोबिंद रमण निरमल साधू संग ॥**
**नानक नामु न विसरउ इक घड़ी करि किरपा भगवंत ॥१॥**
**॥ छंत ॥ भिंनी रैनड़ीऐ चामकनि तारे ॥**
**जागहि संत जना मेरे राम पिआरे ॥**
**राम पिआरे सदा जागहि नामु सिमरहि अनदिनो ॥**
**चरण कमल धिआनु हिरदै प्रभ बिसरु नाही इकु खिनो ॥**
**तजि मानु मोहु बिकारु मन का कलमला दुख जारे ॥**
**बिनवंति नानक सदा जागहि हरि दास संत पिआरे ॥१॥**
**मेरी सेजड़ीऐ आडंबरु बणिआ ॥**
**मन अनदु भइआ प्रभु आवत सुणिआ ॥**

**प्रभ मिले सुआमी सुखह गामी चाव मंगल रस भरे ।।**
**अंग संगि लागे दूख भागे प्राण मन तन सभि हरे ।।**
**मन इछ पाई प्रभ धिआई संजोगु साहा सुभ गणिआ ।।**
**बिनवंति नानक मिले स्रीधर सगल आनंद रसु बणिआ ।।२ ।।**
**मिलि सखीआ पुछहि कहु कंत नीसाणी ।।**
**रसि प्रेम भरी कछु बोलि न जाणी ।।**
**गुण गूड़ गुपत अपार करते निगम अंतु न पावहे ।।**
**भगति भाइ धिआइ सुआमी सदा हरि गुण गावहे ।।**
**सगल गुण सुगिआन पूरन आपणे प्रभ भाणी ।।**
**बिनवंति नानक रंगि राती प्रेम सहजि समाणी ।।३ ।।**
**सुख सोहिलड़े हरि गावण लागे ।।**
**साजन सरसिअड़े दुख दुसमन भागे ।।**
**सुख सहज सरसे हरि नामि रहसे प्रभि आपि किरपा धारीआ ।।**
**हरि चरण लागे सदा जागे मिले प्रभ बनवारीआ ।।**
**सुभ दिवस आए सहजि पाए सगल निधि प्रभ पागे ।।**
**बिनवंति नानक सरणि सुआमी सदा हरि जन तागे ।।४ ।।१ ।।१० ।।** (श्री. गु. ग्रं. सा. ४५९)

**शब्दार्थ : सुभ** – शुभ; **भिंनी** – भिजलेली; **रैनड़ीआ** – रात्र; **चामकनि** – चमकतात; **जागहि** – जागृत; **खिनो** – क्षण; **कलमला** – पाप; **सेजड़ीऐ** – शय्या; **अडंबरु** – अवडंबर; **सबणिआ** – बनले; **सुखह गामी** – सुखदायक; **चाव** – प्रेम, प्रसन्नता; **हरे** – हिरवेगार, टवटवीत, प्रसन्न; **संजोगु** – संयोग, मिलन; **सुभ गणिआ** – शुभ मुहूर्त; **गुड़** – गूढ; **निगम** – वेद; **सुगिआन** – श्रेष्ठ ज्ञान; **सोहिलडे** – स्तुती गीते; **सरसिअडे** – प्रफुल्लित होणे; **सरसे** – वाढले; **बनवारीआ** – वनमाळी; **पागे** – पार, चरण; **तागे** – क्रियाशील;

**भावार्थ :** नानक प्रभू परमात्म्यास प्रार्थना करतात की, हे प्रभो ! माझ्यावर कृपा कर की ज्या योगे माझे विचार चांगले होतील. माझे मन निर्मल साधु संतांच्यासंगतीत रमेल. हे प्रभू ! मला तुझ्या नामाचा घडीभरही विसर पडू नये अशी माझ्यावर कृपा कर. ।।१ ।।छंत ।। ज्याप्रमाणे अंधाऱ्या रात्री आकाशात तारे चमकत असतात. रात्री दवाने भिजलेल्या गवतावर दवबिंदू चमकत असतात. त्याप्रमाणे सारे जग जेव्हा अज्ञानरूपी रात्री मोहमायेत निद्रिस्त असते त्या वेळी प्रभू परमात्म्यास प्रिय असलेले संतजन मात्र जागृत असतात व जीवांना मार्गदर्शन करत असतात. असे प्रभुप्रिय संत अखंड सावधान व जागृत राहून प्रभू परमात्म्याचे सतत नामस्मरण करत असतात. ते एक क्षणही प्रभू परमात्म्यास विसरत नाहीत. त्यांच्या हृदयात असलेल्या प्रभू परमात्म्याच्या चरणकमलावर त्यांचे ध्यान एकाग्र झालेले असते. त्यांनी आपल्या मनातील अहंभाव, मोह, विकार यांचा त्याग केलेला असतो. मनातील सारे पाप, कुविचार, दु:ख जाळून टाकलेले असते. नानक सांगतात, असे सदैव सावध व जागृत असलेले प्रभूचे सेवक संत प्रभू परमात्म्यास प्रिय होतात. ।।१ ।। माझी हृदयरूपी शेज पतिप्रभू मिलनासाठी मी सजवून ठेवली आहे. प्रभुपती येत असल्याचे ऐकून माझे मन आनंदाने भरून गेले आहे. प्रभु मिलनाच्या कल्पनेने माझ्या मनात सुखदायक भाव उत्पन्न झाले व हृदय मंगलरसाने भरून गेले. प्रभुपतीच्या अंगसंगाने माझे सर्व दु:ख पळून गेले. माझे तन-मन सर्वांग प्रमुदित झाले. मला नामस्मरणाने मनोवांच्छित फल प्राप्त झाले. प्रभुमिलनाचा हा योग

माझ्यासाठी खरोखरच एक शुभमुहूर्तच ठरला. नानक सांगतात. प्रभु मिलनाने सर्व प्रकारचा आनंद व रस याने हृदय भरून जाते. ॥२॥ माझ्या सत्संगी सख्या मला विचारतात, की तुझा पती कसा आहे ? त्याचे रूप कसे आहे ? त्याला कोणत्या प्रकारे ओळखावे ? पण मी त्याच्या प्रेमरसात इतकी दंग होऊन गेले होते की मी काहीच बोलू शकले नाही. त्या कर्त्या प्रभू परमात्माचे गुण गूढ, गंभीर व अपार आहेत. वेदांनाही त्याचा अंत लागला नाही. भक्तिभावाने पूर्ण श्रद्धेने त्याचे नामस्मरण करावे व सदैव त्या प्रभू परमात्म्याचे गुणगान गावे. जी जीवस्त्री प्रभू परमात्म्याचे सर्व गुण आपल्या अंगी बाणवते, पूर्ण श्रेष्ठ ज्ञान प्राप्त करते, ती जीवस्त्री प्रभुपतीस आवडते. नानक सांगतात, जी जीवस्त्री प्रभुपतीच्या प्रेमात पूर्णपणे रंगून गेली, ती सहजावस्थेत पोहोचून प्रभुपतीशी एकरूप होऊन जाते. प्रभुरूपात विलीन होते. ॥३॥ जीवात्म्याने जेव्हा परमात्म्याचे गुणगान केले, तेव्हा त्यास सुख प्राप्त झाले. संतसज्जन आनंदित झाले तर दुःखरूपी शत्रू पळून गेला. प्रभू परमात्म्याच्या कृपेने व प्रभुनामाच्या स्मरणाने सर्वश्रेष्ठ अशा सहजसुखाची प्राप्ती झाली. जीवात्मा हरिचरणी शरण गेल्याने, जीव मोहमायेपासून सदैव जागृत राहिल्याने त्यास वनमाळी प्रभू परमात्म्याची प्राप्ती झाली. आता जीवास आनंदाचे दिवस प्राप्त झाले. सहजावस्था प्राप्त होऊन प्रभुचरणांची प्राप्ती झाली. नानक सांगतात. प्रभूचे सेवक प्रभू परमात्म्यांच्या प्राप्तीसाठीच सदैव क्रियाशील असतात. ॥४॥१॥१०॥

**॥ आसा महला ५ ॥**

**उठि वञु वटाऊड़िआ तै किआ चिरु लाइआ ॥**
**मुहलति पुंनड़ीआ कितु कूड़ि लोभाइआ ॥**
**कूड़े लुभाइआ धोहु माइआ करहि पाप अमितिआ ॥**
**तनु भसम ढेरी जमहि हेरी कालि बपुड़ै जितिआ ॥**
**मालु जोबनु छोडि वैसी रहिओ पैनणु खाइआ ॥**
**नानक कमाणा संगि जुलिआ नह जाइ किरतु मिटाइआ ॥१॥**
**फाथोहु मिरग जिवै पेखि रैणि चंद्राइणु ॥**
**सूखहु दूख भए नित पाप कमाइणु ॥**
**पापा कमाणे छडहि नाही लै चले घति गलाविआ ॥**
**हरिचंदउरी देखि मूठा कूड़ु सेजा राविआ ॥**
**लबि लोभि अहंकारि माता गरबि भइआ समाइणु ॥**
**नानक म्रिग अगिआनि बिनसे नह मिटै आवणु जाइणु ॥२॥**
**मिठै मखु मुआ किउ लए ओडारी ॥**
**हसती गरति पइआ किउ तरीऐ तारी ॥**
**तरणु दुहेला भइआ खिन महि खसमु चिति न आइओ ॥**
**दूखा सजाई गणत नाही कीआ अपणा पाइओ ॥**
**गुझा कमाणा प्रगटु हुआ ईत उतहि खुआरी ॥**
**नानक सतिगुर बाझु मूठा मनमुखो अहंकारी ॥३॥**
**हरि के दास जीवे लगि प्रभ की चरणी ॥**

**कंठि लगाइ लीए तिसु ठाकुर सरणी ॥**
**बल बुधि गिआनु धिआनु अपणा आपि नामु जपाइआ ॥**
**साधसंगति आपि होआ आपि जगतु तराइआ ॥**
**राखि लीए रखणहारै सदा निरमल करणी ॥**
**नानक नरकि न जाहि कबहूं हरि संत हरि की सरणी ॥४॥२॥११॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४५९)

**शब्दार्थ : वंञु** – चल; **वटाऊडिआ** – पथिक, वाटसरू; **चिरु** – उशीर; **मुहलति** – मुदत; **पुंनडिआ** – पूर्ण झाली; **कितु** – का कशाला; **कूड़ि** – खोटी, मायावी; **धोहू** – धोका; **आमितिआ** – अनंत; **हेरी** – हेरली, पाहिली; **बपुड़ै** – बिचारा; **मालु** – संपत्ती; **पैनणू** – परिधान करणे, वस्त्र; **कमाणा** – कर्म; **जूलिआ** – जाईल; **फातोहु** – फसणे; **मिरग** – मृग, हरिण; **जिवै** – ज्याप्रमाणे; **पेखि** – पाहून; **घति** – पाश; **गलाविआ** – गळ्यात; **हरिचंदउरी** – चमत्कार; **मूठा** – धोका खाणे, फसणे; **राविआ** – भोगतो; **लब** – लालच; **मात** – मस्त होणे; **मिठै** – गोड; **मखु** – माशी; **ओडारी** – उडणे; **गरति** – खड्ड्यात; **दुहेला** – अवघड, कठीण; **सजाइ** – सजा, शिक्षा; **गुझा** – गुप्तपणे; **ईत** – येथे, ह्यालोकी; **उताहि** – तेथे, परलोकात; **खुआरि** – अपमानित; **बाझु** – शिवाय; **होआ** – होणे, होते.

**भावार्थ :** हे जीवा ! हे पथिका ! ऊठ, चालू लाग. का उगाच उशीर करतोस ? तुला येथे, ह्या जगात राहण्याची जी मुदत दिली होती ती आता संपत आली आहे. तुझे आयुष्य संपत आले आहे. अजूनही तू ह्या खोट्या मोहमायेत का अडकून पडला आहेस ? मायेत अडकलेला जीव मायेकडून फसवला जातो व असंख्य पापे करतो. अरे शरीर हे केवळ राखेचा ढीग आहे. त्याच्यावर आता यमाची नजर गेली आहे. व काळाचा विजय झाला आहे. धन, यौवन खाणे पिणे, वस्त्र प्रावर्णे सर्व काही येथेच सोडून जावे लागणार आहे. नानक सांगतात, येथून जाताना तू येथे जे कर्म केलेस तेवढेच तुझ्याबरोबर जाईल. कर्मफळ कोणीही नष्ट करू शकत नाही. ॥१॥ हरीण रात्रीचे वेळी शिकाऱ्याने निर्माण केलेल्या कृत्रिम प्रकाशाला भुलून आपल्याच नाशास कारण होतो. त्याप्रमाणे जीव संसाराच्या झगमगाटाला पाहून त्यात अडकून सुखाच्या ऐवजी दुःखी होऊन पापच कमावतो. तरीही जीव पाप करण्याचे सोडीत नाही व अखेरीस यम त्याच्या गळ्यात फास अडकवून त्यास घेऊन जातो. मायावी चमत्कारास तो फसतो व मायावी गोष्टीतच रममाण होतो. लालसा, लोभ, अहंकारात मस्त होऊन राहतो. नानक सांगतात, हा जीवरूपी मृग अज्ञानामुळे आपला विनाश ओढवून घेतो व त्यामुळे तो जन्ममरणाच्या चक्रात अडकून पडतो. ॥२॥ ज्याप्रमाणे गोडाला चिकटल्यामुळे माशी उडू शकत नाही. खड्ड्यात पडलेला हत्ती त्यातून बाहेर पडू शकत नाही. त्याप्रमाणे प्रभू परमात्म्याचे क्षणभरही स्मरण न करता मायेत फसलेला जीव भवसागर तरून जाणे अशक्य आहे. त्यास भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची, शिक्षेची गणतीच करता येत नाही. त्याने केलेल्या कर्माची फळे त्यास भोगावीच लागतात. जीवाने लपून छपून केलेले पापही अखेर उघडे पडते व त्यास इहलोकात व परलोकातही अपमानित व्हावे लागते. नानक सांगतात, सतगुरूची प्राप्ती न झाल्याने जीव सदैव स्वेच्छाचारी बनून अहंकारात बुडून जातो. ॥३॥ प्रभूचे सेवक सदैव प्रभुचरणी लीन होऊन आत्मिक जीवन जगतात. ते प्रभुचरणी शरण गेल्याने प्रभू परमात्मा त्यांना आपल्याशी एकरूप करून घेतो. बल, बुद्धी, ज्ञान, ध्यान आदी माध्यमातून प्रभू परमात्मा स्वत: त्यांना नामस्मरणाची प्रेरणा देतो. तो प्रभू परमात्माच त्यांना संतसंगत प्राप्त करून देतो व तोच त्यांना भवसागर पार करून नेतो. जे निर्मल कर्म करतात, सत्कर्म करतात त्यांचे प्रभू परमात्मा सदैव रक्षण करतो. नानक सांगतात, प्रभू परमात्म्यास शरण गेलेले संतजन कधीही नरकात जात नाहीत. कुमार्गाकडे जात नाहीत. ॥४॥२॥११॥

## ॥ आसा महला ५ ॥

**वंञु मेरे आलसा हरि पासि बेनंती ॥**
**रावउ सहु आपनड़ा प्रभ संगि सोहंती ॥**
**संगे सोहंती कंत सुआमी दिनसु रैणी रावीऐ ॥**
**सासि सासि चितारि जीवा प्रभु पेखि हरि गुण गावीऐ ॥**
**बिरहा लजाइआ दरसु पाइआ अमिउ द्रिसटि सिंचंती ॥**
**बिनवंति नानकु मेरी इछ पुंनी मिले जिसु खोजंती ॥१ ॥**
**नसि वंञहु किलविखहु करता घरि आइआ ॥**
**दूतह दहनु भइआ गोविंदु प्रगटाइआ ॥**
**प्रगटे गुपाल गोबिंद लालन साधसंगि वखाणिआ ॥**
**आचरजु डीठा अमिउ वूठा गुर प्रसादी जाणिआ ॥**
**मनि सांति आई वजी वधाई नह अंतु जाई पाइआ ॥**
**बिनवंति नानक सुख सहजि मेला प्रभू आपि बणाइआ ॥२ ॥**
**नरक न डीठड़िआ सिमरत नाराइण ॥**
**जै जै धरमु करे दूत भए पलाइण ॥**
**धरम धीरज सहज सुखीए साधसंगति हरि भजे ॥**
**करि अनुग्रहु राखि लीने मोह ममता सभ तजे ॥**
**गहि कंठि लाए गुरि मिलाए गोविंद जपत अघाइण ॥**
**बिनवंति नानक सिमरि सुआमी सगल आस पुजाइण ॥३ ॥**
**निधि सिधि चरण गहे ता केहा काड़ा ॥**
**सभु किछु वसि जिसै सो प्रभू असाड़ा ॥**
**गहि भुजा लीने नाम दीने करू धारि मसतकि राखिआ ॥**
**संसार सागरु नह विआपै अमिउ हरि रसु चाखिआ ॥**
**साध संगे नाम रंगे रणु जीति वडा अखाड़ा ॥**
**बिनवंति नानक सरणि सुआमी बहुड़ि जमि न उपाड़ा ॥४ ॥३ ॥१२ ॥**

(श्री. गु. ग्रं. सा. ४६०)

**शब्दार्थ : वंञु** – दूर करणे, काढून टाकणे; **आलसा** – आळस; **रावउ** – रममाण कर; **सहु** – स्वामी; **सोहंती** – शोभा; **चितारि** – स्मरण करणे; **बिरहा** – विरह; **लजाइआ** – लाजला; **अमिउ** – अमृत; **सिंचती** – सिंचन करते; **खोजंती** – शोधत होते; **नसि** – नष्ट; **किल विखहु** – पापे; **घरि** – ह्रदयात; **दूतह** – यमदूत; **लालन** – प्रियकर; **डिठा** – पाहिले; **वूठा** – वर्षाव; **पलाइआ** – पळाले; **राखि लिने** – रक्षण कर; **पूजाइण** – पूर्ण करणारा; **काड़ा** – दु:ख; **असाड़ा** – आपलासा केला, स्वीकार केला.

**भावार्थ :** हे प्रभो ! माझी तुला विनंती आहे की माझा आळस दूर कर. हे स्वामी ! मला तुझ्या संगतीत रममाण करून शोभायमान कर. हे प्रभो ! मी रात्रंदिवस प्रभुपतीच्या, माझ्या स्वामीच्या संगाने शोभिवंत होऊन त्याच्याशी एकरूप होऊन राहावे. प्रत्येक श्वासागणिक प्रभुपतीचे स्मरण करण्यातच माझे जीवन व्यतीत व्हावे. प्रभुपतीचे मला सदैव दर्शन व्हावे व मी सदैव त्याचे गुणगान करत राहावे. मला जेव्हा प्रभू परमात्म्याचे दर्शन झाले तेव्हा माझी विरहव्यथा लज्जीत होऊन दूर पळून गेली. आता माझ्या प्रभुपतीची प्रेमार्द्र दृष्टी माझ्यावर प्रेमामृताचा वर्षाव करत आहे. नानकरूपी स्त्री जीवात्मा विनयपूर्वक सांगते की, माझी इच्छा आज परिपूर्ण झाली. मी ज्यास आजवर शोधत होते तो माझा पतिप्रभू मला प्राप्त झाला आहे. ।।१ ।। माझ्या मनातील पापी विचारांनो आता तुम्ही येथून दूर निघून जा. माझ्या हृदयात आता तो कर्तापुरुष प्रगट झाला आहे. प्रभुपती अंत:करणात प्रगट झाल्याने यमदूत जळून नष्ट झाले. मरणाचे भय नष्ट झाले. मी साधुसंगतीत बसून माझ्या प्रियकर प्रभुपतीचे गुण गायल्याने माझ्या हृदयात प्रभू परमात्मा प्रगट झाला. सतगुरुकृपेने मी प्रभुपतीस ओळखले व तो माझ्यावर आपल्या अमृतमय प्रेमाचा वर्षाव करत आहे, असे आश्चर्य मी अनुभवले. आता माझे मन शांत झाले आहे. प्रभू परमात्म्याची मधुर वाद्ये माझ्या हृदयात वाजत आहेत. मला प्राप्त झालेल्या ह्या आत्मिक अनुभूतीला काही पारावारा नाही. ।।२ ।। नानक सांगतात, मला सहजसुखाची प्राप्ती झाली. हे प्रभो ! हे सारे तूच घडवून आणलेस. प्रभू परमात्मा नारायणाचे स्मरण केल्याने नरकाचे दर्शन सुद्धा घडत नाही. स्वत: धर्मराज अशा जीवाचा जय जयकार करतात व यमदूत तर पळ काढतात. जो साधुसंतांच्या संगतीत प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतो, त्यास धर्म, धैर्य व सहजावस्था प्राप्त होते. प्रभू परमात्म्याची कृपा झाल्यावर जीवाच्या मनातील मोह-ममता नष्ट होतात व जीवाचे मायेपासून, विषयविकारांपासून रक्षण होते. सतगुरूच्या माध्यमातून प्रभू परमात्म्याशी मिलन झाल्यावर तो प्रभू जीवास आपल्या हृदयाशी धरतो व जीव प्रभू परमात्म्याच्या नामस्मरणाने पूर्ण तृप्त होतो. नानक सांगतात, की प्रभुनामाच्या स्मरणाने जीवाच्या सर्व आशा परिपूर्ण होतात. ।।३ ।। ऋद्धी, सिद्धी प्रदान करणाऱ्या प्रभू परमात्म्याच्या चरणी शरण गेल्यास कोणतेही दु:ख शिल्लक राहत नाही. सर्व दु:खे नष्ट होतात. ज्याच्या ताब्यात सर्व काही आहे अशा सर्वशक्तिमान प्रभू परमात्म्यास मी आपलासा केला आहे. त्याने मला हाती धरून नामाचे दान दिले व माझ्या मस्तकी आपला वरदहस्त ठेवला आहे. प्रभुनामरूप अमृताची चव चाखल्याने मला आता संसारसागरातील कोणतेही दु:ख भोगावे लागत नाही. साधुसंतांच्या संगतीत राहून प्रभूनामात पूर्णपणे रंगून जाऊन मी ह्या संसाररूपी रणक्षेत्रात विजय प्राप्त केला आहे. नानक सांगतात, जो प्रभू परमात्म्यास शरण गेला त्यास यम परत कधीही मारू शकत नाही. तो जन्ममरणाच्या चक्रातून कायमचा मुक्त होतो. ।।४ ।।३ ।।१२ ।।

**।। आसा महला ५ ।।**

**दिनु राति कमाइअड़ो सो आइओ माथै ।।**
**जिसु पासि लुकाइदड़ो सो वेखी साथै ।।**
**संगि देखै करणहारा काइ पापु कमाईऐ ।।**
**सुक्रितु कीजै नामु लीजै नरकि मूलि न जाईऐ ।।**
**आठ पहर हरि नामु सिमरहु चलै तेरै साथे ।।**
**भजु साधसंगति सदा नानक मिटहि दोख कमाते ।।१ ।।**
**वलवंच करि उदरु भरहि मूरख गावारा ।।**
**सभु किछु दे रहिआ हरि देवणहारा ।।**

दातारु सदा दइआलु सुआमी काइ मनहु विसारीऐ ।।
मिलु साधसंगे भजु निसंगे कुल समूहा तारीऐ ।।
सिध साधिक देव मुनि जन भगत नामु अधारा ।।
बिनवंति नानक सदा भजीऐ प्रभु एकु करणैहारा ।।२ ।।
खोटु न कीचई प्रभु परखणहारा ।।
कूडु कपटु कमावदड़े जनमहि संसारा ।।
संसारु सागरु तिन्ही तरिआ जिन्ही एकु धिआइआ ।।
तजि कामु क्रोधु अनिंद निंदा प्रभ सरणाई आइआ ।।
जलि थलि महीअलि रविआ सुआमी ऊच अगम अपारा ।।
बिनवंति नानक टेक जन की चरण कमल अधारा ।।३ ।।
पेखु हरिचंदउरड़ी असथिरु किछु नाही ।।
माइआ रंग जेते से संगि न जाही ।।
हरि संगि साथी सदा तेरै दिनसु रैणि समालीऐ ।।
हरि एक बिनु कछू अवरु नाही भाउ दुतीआ जालीऐ ।।
मीतु जोबनु मालु सरबसु प्रभु एकु करि मन माही ।।
बिनवंति नानकु वडभागि पाईऐ सूखि सहजि समाही ।।४ ।।४ ।।१३ ।।

(श्री. गु. ग्रं. सा. ४६१)

**शब्दार्थ : कमाइअडो** – कमावले; **माथै** – कपारी; **जितु** – जे ज्याच्या पासून; **लुकाइदडो** – लपवलेस; **करणहारा** – करणारा, कर्ता, प्रभू; **काइ** – का, कशाकरिता; **सुक्रितु** – सत्कर्म; **मिटहि** – नष्ट होतात; **वलवंच** – जबरदस्तीने, जुलूम करून; **देवणहारा** – देणारा; **निसंगे** – नि:शंकपणे; **करणै हारा** – कर्ता; **खोटु** – खोटे, लबाडी; **कीचई** – करणे; **परखणहारा** – पारख करणारा; **आनंद** – अनिंदा, सतपुरुष; **टेक** – आश्रम; **हरिचंद्रउरडी** – (माया नगरी) स्वप्ननगरी, कल्पनारम्य नगरी; **भाउदुतीआ** – द्वैतभाव; **सरबसु** – सर्वस्व.

**भावार्थ :** बा जीवा ! रात्रं दिवस तू जे कर्म करतोस त्यानुसारच तुझा कर्मलेख लिहिला जातो. तू ज्याच्यापासून लपून छपून कर्म करतोस तो प्रभू परमात्मा तर सदैव तुझ्या समवेतच असतो. तो तू जे काही करतोस ते सर्व पाहत असतो. म्हणून हे जीवा तू पापकर्म का करतोस ? सत्कर्म कर. प्रभू परमात्म्याचे नामस्मरण कर. त्यामुळे तुला कधीही नरकात जावे लागणार नाही. अष्टौप्रहर हरिनामाचे स्मरण कर. तेच अंती तुझ्या बरोबर येणार आहे. नानक सांगतात, साधुसंतांच्या संगतीत सदैव प्रभू परमात्म्याचे स्मरण कर. त्यामुळे तू केलेले पाप नष्ट होईल. ।।१ ।। अरे मूर्खा इतरांवर जुलूम जबरदस्ती करून त्यांच्याशी लांड्यालबाड्या करून तू तुझे पोट भरतोस. अरे तुला कसे कळत नाही की तो दाता प्रभू परमेश्वरच सर्व जीवांना जे हवे ते सर्व देत असतो. अशा ह्या दात्या प्रभू परमात्म्यास तू का बरे विसरतोस ? साधुसंतांच्या संगतीत बसून नि:शंक मनाने तू प्रभुनामाचे स्मरण कर. त्यामुळे तुझ्या संपूर्ण कुळाचा उद्धार होईल सिद्ध, साधक देव, मुनीजन, भक्त ह्या सर्वांचा प्रभुनाम हाच आधार असतो. नानक विनम्रपणे सांगतात, की सर्व काही करणारा तो एकमेव प्रभू परमात्म्याच आहे. हे जीवा ! तू त्याचे नित्य स्मरण कर. ।।२ ।। हे जीवा ! जगात व्यवहार करताना तू यत्किंचितही लबाडी, खोटेपणा करू नकोस. तो प्रभू

परमात्म्या तुझ्या कर्माची पारख करत आहे. जे जीव खोटेपणाने, कपट मार्गाने कर्म करतात, ते सदैव जन्ममरणाच्या चक्रातच फिरत राहतात. पण जे केवळ त्या एकमेव प्रभू परमात्म्याचे नामस्मरण करतात, ते संसारसागर पार करून जातात. असे लोक संतजनांची, आदरणीय पुरुषांची निंदा करत नाहीत. काम क्रोध आदी विकारांचा त्याग करून प्रभू परमात्म्यास शरण जातात. तो प्रभू परमात्मा सर्वश्रेष्ठ आहे. अपार अगम्य आहे. तो जळी, स्थळी, अंतराळी सर्वत्र आहे. सर्वव्याप्त आहे. नानक विनयपूर्वक सांगतात की प्रभू परमात्मा हाच सर्व प्रभुसेवकांचा एकमेव आधार आहे. ते प्रभुचरणी शरण जाऊन त्याचाच आश्रय घेतात ॥३॥ हे जीवा ! तुला दिसणारी ही झगमगती दुनिया केवळ स्वप्ननगरी आहे. हे सारे काही नश्वर आहे. ह्यातील काहीही कायम टिकणारे स्थिर राहाणारे नाहीये. ह्या मायेचे जे जे रंग तू पाहात आहेस. त्यापैकी अंती तुझ्या बरोबर काहीही जाणार नाही, केवळ प्रभू परमात्माच सदैव तुझ्या बरोबर येणार आहे. रात्रंदिवस तू त्याचे नामस्मरण कर. मनातील द्वैतभाव जाळून भस्म करून टाक. ह्या जगात एकमेव प्रभू परमात्म्याशिवाय अन्य काहीही नाही. त्या केवळ प्रभू परमात्म्यासच तुझा मित्र, यौवन, धनसंपत्ती सारे काही तोच आहे असे मान. नानक सांगतात, असा जीव महाभाग्यशाली होतो. त्यास सहजावस्था प्राप्त होते. तो सुखी होतो व प्रभू परमात्म्यास प्राप्त करतो. ॥४॥४॥१३॥

**॥ आसा महला ५ छंत घरु ८ ॥**

**१ ओअंकार सतिगुर प्रसादि ॥**

(ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. सतगुरुकृपेने तो प्राप्त होतो.)

**कमला भ्रम भीती कमला भ्रम भीती हे तीखण मद बिपरीति हे अवध अकारथ जात ॥**
**गहबर बन घोर गहबर बन घोर हे ग्रिह मूसत मन चोर हे दिनकरो अनदिनु खात ॥**
**दिन खात जात बिहात प्रभ बिनु मिलहु प्रभ करुणा पते ॥**
**जनम मरण अनेक बीते प्रिअ संग बिनु कछु नह गते ॥**
**कुल रूप धूप गिआनहीनी तुझ बिना मोहि कवन मात ॥**
**कर जोड़ि नानकु सरणि आइओ प्रिअ नाथ नरहर करहु गात ॥१॥**
**मीना जलहीन मीना जलहीन हे ओहु बिछुरत**
**मन तन खीन हे कत जीवनु प्रिअ बिनु होत ॥**
**सनमुख सहि बान सनमुख सहि बान हे म्रिग**
**अरपे मन तन प्रान हे ओहु बेधिओ सहज सरोत ॥**
**प्रिअ प्रीति लागी मिलु बैरागी खिनु रहनु ध्रिग तनु तिसु बिना ॥**
**पलका न लागै प्रिअ प्रेम पागै चितवंति अनदिनु प्रभ मना ॥**
**स्रीरंग राते नाम माते भै भरम दुतीआ सगल खोत ॥**
**करि मइआ दइआ दइआल पूरन हरि प्रेम नानक मगन होत ॥२॥**
**अलीअल गुंजात अलीअल गुंजात हे मकरंद**
**रस बासन मात हे प्रीति कमल बंधावत आप ॥**
**चात्रिक चित पिआस चात्रिक चित्र पिआस**

**हे धन बूंद बचित्रि मनि आस हे अल पीवत बिनसत ताप ।।**
**तापा बिनासन दूख नासन मिलु प्रेमु मनि तनि अति घना ।।**
**सुंदरु चतुरु सुजान सुआमी कवन रसना गुण भना ।।**
**गहि भुजा लेवहु नामु देवहु द्रिसटि धारत मिटत पाप ।।**
**नानकु जंपै पतित पावन हरि दरसु पेखत नह संताप ।।३ ।।**
**चितवउ चित नाथ चितवउ चित नाथ हे रखि लेवहु**
**सरणि अनाथ हे मिलु चाउ चाईले प्रान ।।**
**सुंदर तन धिआन सुंदर तन धिआन हे मनु लुबध**
**गोपाल गिआन हे जाचिक जन राखत मान ।।**
**प्रभ मान पूरन दुख बिदीरन सगल इछ पुजंतीआ ।।**
**हरि कंठि लागे दिन सभागे मिलि नाह सेज सोहंतीआ ।।**
**प्रभ द्रिसटि धारी मिले मुरारी सगल कलमल भए हान ।।**
**बिनवंति नानक मेरी आस पूरन मिले स्रीधर गूण निधान ।।४ ।।१ ।।१४ ।।**

(श्री. गु. ग्रं. सा. ४६१)

**शब्दार्थ : कमला** – लक्ष्मी; **भीति** – भिंत; **तीखण** – तीक्ष्ण; **अवध** – आयुष्य; **अकारथ** – विनाकारण, व्यर्थ; **गहबर** – गहन घोर; **मूसत** – लुटणे; **खात** – खातो; **बिहात** – शिवाय; **बीते** – निघून गेले; **मीना** – मासा; **बिछु** – वियोगाने; **खीन** – क्षीण; **कत** – कसे; **सहि** – सहन करणे; **बान** – बाण; **ओहु** – तो; **बेधिआ** – विद्ध होतो; **सरोत** – वीणा; **बैरागी** – विरक्त; **पलका** – पापणी; **चितवंती** – चिंतन करणे; **पागै** – मग्न; **दुतीआ** – द्वैत; **अलीअल** – भ्रमर; **बासन** – वास; **मात** – मस्त; **बंधावत** – बांधून घेतो; **अल** – पाणी; **कवन** – कोणत्या; **भुजा** – दंड; **पेखत** – पाहून; **चितवउ** – चिंतन; **चाउ** – प्रेम; **जाचिक** – याचक; **बिदीरन** – विदीर्ण, नष्ट; **पुजंतिआ** – पूर्ण होतात; **सोहंतीआ** – शोभायमान; **कलमल** – पाप.

**भावार्थ :** हे बंधू ! लक्ष्मी म्हणजे धनसंपत्ती ही जीवाच्या आत्मिक उन्नतीच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे. पण हा अडथळा मोठा विचित्र आहे. त्याचा राग येण्याऐवजी जीव त्याच्यावर लुब्धच होतो. मायेत मस्त होऊन प्राणी आपले जीवन वाया घालवतो. ही माया म्हणजे एक घोर अरण्य आहे. ह्या जंगलात विकाररूपी चोर जीवाला लुटतात. अशा रीतीने प्रत्येक दिवस जीवाचा नाशच होत असतो. असे दिवसामागून दिवस जात असतात व करुणापती प्रभूच्या मिलनाशिवायच जन्म वाया जातो. असे अनेक जन्म आले आणि गेले पण प्रभू परमात्म्याची प्राप्ती न होता प्रभूपतीशी संग न होताच वाया गेले. हे प्रभो ! मी कुलहीन, रूपहीन, ज्ञानहीन आहे. माझ्यावर तुझ्याशिवाय अन्य कोण प्रेम करणार ? नानक म्हणतात हे प्रभो ! हे नाथ ! हे नरहरी ! मी तुला हात जोडून शरण आलो आहे. मला परमगती दे. मला मुक्ती दे. ।।१ ।। पाण्याबाहेर काढलेली मासळी पाण्याच्या विरहाने तडफडून तडफडून मरते. हे प्रभो ! तुझ्या विरहाने माझीही तीच अवस्था झाली आहे. हरिण गान लुब्ध आहे. विणेच्या झंकाराने ते आकर्षित होते व समोरून येणाऱ्या बाणाने विद्ध होते. त्याप्रमाणेच माझी स्थिती झाली आहे. हे प्रभू प्रियकरा ! तुझ्या प्रेमाने माझे मन लुब्ध झाले आहे. संसारापासून विरक्त होऊन मी तुझ्याकडे धाव घेत आहे. आता तुझ्याशिवाय मी एक क्षणही राहू शकत नाही. प्रभुपतीच्या प्रेमात मग्न झाल्याने माझ्या पापण्या जरा सुद्धा मिटत नाहीत. मला मुळीच झोप लागत नाही. मी सदैव प्रेममग्न होऊन रात्रंदिवस प्रभु परमात्म्याचेच चिंतन करते. श्रीरंगाच्या

नामात रत झाल्याने द्वैताचे सगळे भ्रम नष्ट होतात. नानक म्हणतात, हे दीनदयाळा ! माझ्यावर दया कर. माझे मन तुझ्या नामात तल्लीन होऊ दे. ॥२॥ भ्रमर कमळावरील प्रेमामुळे कमळाभोवती सतत गुंजारव करत राहतो व कमलपुष्पाच्या प्रेमबंधनात स्वत:स बद्ध करून घेतो. चातकाला एक विचित्र अशी तहान लागलेली असते. स्वाती नक्षत्रातील मेघांच्या एका जलबिंदूने त्याची तहान तृप्त होते. त्याप्रमाणेच माझ्या मनाला, तापविनाशक, दु:खनिवारक अशा प्रभु मिलनाची तीव्र ओढ लागली आहे. हे माझ्या सुंदर, चतुर, सुजाण स्वामी ! मी कोणत्या जिव्हेने तुझे गुणगान करू ? कितीही स्तुती केली तरी ती अपुरीच पडेल. तुझे पूर्ण गुणगान करणे माझ्या शक्तीच्या पलीकडे आहे. मला हाती धरून तुझे नाम तू मला दे, तुझी कृपादृष्टी होताच माझे पाप नष्ट होईल. नानक तर सदैव त्या पतितपावन प्रभू परमात्म्याचेच नामस्मरण करतो, ज्यास प्रभू परमात्म्याचे दर्शन प्राप्त झाले त्यास कोणताही ताप सहन करावा लागत नाही ॥३॥ मी माझ्या अंत:करणात सदैव प्रभू परमात्म्याचे स्मरण करतो. सदैव त्याचेच स्मरण करत राहतो. हे अनाथांच्या नाथा ! मला तुझ्या चरणी आश्रय दे. माझ्या मनात तुझ्याविषयी उत्कट प्रेम भाव वसत आहे. तुझ्या मिलनातच मी आनंद उपभोगतो. हे प्रभो ! तुझ्या ह्या सृष्टिरूपी सुंदर तनूवर माझे मन लुब्ध झाले आहे. माझे मन तुझ्या रचनेशी एकरूप झाले आहे. तुझ्या ज्ञानरूपाने माझे मन मोहित झाले आहे. हे प्रभो ! तू याचकाच्या विनंतीचा मान राखतोस. हे प्रभो ! तू सेवकांचा मान राखतोस, त्यांच्या दु:खांचा पूर्ण नाश करतोस व सर्व इच्छा पूर्ण करतोस. आता माझे सौभाग्याचे दिन आले आहेत. प्रभुपतीस आलिंगन देऊन त्याच्या संगतीने माझी कायारूपी शय्या शोभिवंत झाली आहे. प्रभू परमात्म्याने माझ्यावर कृपा केली आहे. त्या मुरारीशी मिलन झाल्याने मनातील सर्व पाप नष्ट झाले आहे. नानक म्हणतात, हे प्रभो ! माझी तुझे चरणी विनम्र विनंती आहे की त्या गुणनिधान श्रीधराच्या मिलनाची माझी इच्छा पूर्ण कर. ॥४॥१॥१४॥

## ॥ आसा दी वार ॥

## ॥ आसा महला १ ॥

**वार सलोका नालि सलोक भी महले पहिले केलिखे टुंडे असराजै की धुनी ॥**

वार व श्लोक महला १ यांनी लिहिलेले असून ते 'टूंडे असराज' च्या चालीवर म्हणावे.

### १ ओंकार सतिनाम करता पुरखु निरभउ निरवैरू अकाल मूरति अजूनी सैभं गुर प्रसादि ॥

ईश्वर एकच आहे. तो ओंकारस्वरूप आहे. त्याचे नाम सत्य आहे. तो कर्तापुरुष आहे निर्भय व निर्वैर आहे. तो अखोनी संभव आहे. स्वयंभू आहे. तो गुरुकृपेने प्राप्त होतो.

**॥ सलोकु ॥ बलहारी गुर आपणे दिउहाड़ी सद वार ॥**
**जिनि माणस ते देवते कीए करत न लागी वार ॥१॥**
**॥ महला २ ॥ जे सउ चंदा उगवहि सूरज चड़हि हजार ॥**
**एते चानण होंदिआ गुर बिनु घोर अंधार ॥२॥**
**॥ म. १ ॥ नानक गुरू न चेतनी मनि आपणै सुचेत ॥**
**छुटे तिल बूआड़ जिउ सुंञे अंदरि खेत ॥**
**खेतै अंदरि छुटिआ कहु नानक सउ नाह ॥**
**फलीअहि फुलीअहि बपुड़े भी तन विचि सुआह ॥३॥** (श्री. गु. ग्रं. सा. ४६२)